वर्ष: 7 अंक: 01

1-15 जुलै, 2026 (नि:शुल्क)

# न्यू इंडिया समाचार




आम्हाला फॉलो करा @NISPIBIndia

ई-प्रतीसाठी QR कोड स्कॅन करा

## न्याय सुलभतेचे युग

## नवीन कायदा - नवीन विश्वास

भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियमाची गौरवपूर्ण दोन वर्षे, नागरिक केंद्रित न्याय व्यवस्थेच्या निर्मितीच्या ऐतिहासिक वाटचालीचे प्रतीक बनले आहेत...

## डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी

**6 जुलै या जयंती दिनानिमित्त कृतज्ञ राष्ट्राची आदरांजली**

# देशाची एकता, अखंडता

## आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाचे प्रणेते

*आपल्या प्रखर राष्ट्रवादी विचारांनी भारत मातेचा गौरव वाढवणारे डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी भारताच्या विकासात उत्कृष्ट आणि अनुकरणीय योगदान दिले आहे. त्यांच्यासाठी देशाची एकता आणि अखंडतेपेक्षा मोठे काहीही नव्हते. उत्तरेत काश्मीरपासून ते पूर्वेकडे बंगालपर्यंत, त्यांनी देशाच्या इंच-इंच भूमीसाठी आणि जम्मू-काश्मीरमधील दोन प्रधान, दोन विधान, दोन निशान संपुष्टात आणण्यासाठी संघर्ष केला. मातृभूमीसाठीचे त्यांचे समर्पण आणि त्याग देशवासियांना सदैव प्रेरणा देत राहील...*

*देशाचे अमर सुपुत्र डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांना त्यांच्या जन्मजयंतीनिमित्त भावपूर्ण आदरांजली. देशाची आन-बान आणि शान चे रक्षण करण्यासाठी त्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले. त्यांचे आदर्श आणि मूल्ये विकसित आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीसाठी बहुमूल्य आहेत.*

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



न्यू इंडिया
समाचार
वर्ष: 7, अंक: 01 I 1-15 जुलै, 2026

प्रधान संपादक
धीरेंद्र ओझा
प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय , नवी दिल्ली

मुख्य सल्लागार संपादक
संतोष कुमार

वरिष्ठ सहाय्यक सल्लागार संपादक
पवन कुमार

सहाय्यक सल्लागार संपादक
अखिलेश कुमार
चंदन कुमार चौधरी

भाषा संपादक
सुमित कुमार (इंग्रजी)
रजनीश मिश्रा (इंग्रजी)
नदीम अहमद (उर्दू )

वरिष्ठ डिझायनर
फूलचंद तिवारी

डिझायनर
अभय गुप्ता
सत्यम सिंह



**13 भाषांमध्ये उपलब्ध न्यू इंडिया समाचार वाचण्यासाठी येथे क्लिक करा.**

https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

**न्यू इंडिया समाचारचे जुने अंक वाचण्यासाठी क्लिक करा.**

https://newindiasamachar.pib.gov.in/archive.aspx

न्यू इंडिया समाचार बद्दल नियमित अपडेटसाठी फॉलो करा:-@NISPIBIndia

# आतील पानांवर..




**मुखपृष्ठ कथा**

दोन शतकांचे अंतर पार करत 21 व्या शतकात भारताला गुलामीच्या सावटातून मुक्त असलेला स्वतःचा कायदा मिळाला. यामुळेच तर, नागरिक असोत वा पोलीस अथवा न्यायालये, गेल्या 2 वर्षांत न्यायाचे पुस्तक आणि भाषा दोन्ही बदलले आहेत. या नवीन बदलामुळे भारताचा प्रत्येक नागरिक स्वदेशी न्याय व्यवस्थेचा नवीन सूर्योदय अनुभवू लागला आहे... | 14-23

**भारताचे सर्वात जास्त काळ सेवा देणारे निवडून आलेले पंतप्रधान**

**सेवा, साहस आणि राष्ट्र उभारणीच्या** अविरत साधनेचे प्रतीक

**पंतप्रधान नरेंद्र मोदी**



प्रगतीपथावर अग्रेसर... 12 वर्षांचा हा विकासाचा प्रवास एका युगाच्या रूपात प्रस्थापित झाला आहे | 6-10

**ऐतिहासिक नेतृत्व, जागतिक प्रशंसा**

**नवा भारत, समर्थ भारत**

पंतप्रधान मोदी हे भारताचे सर्वाधिक काळ सलग सेवा देणारे निवडून आलेले पंतप्रधान बनले आहेत. या गौरवपूर्ण प्रसंगी जागतिक व्यासपीठावरूनही मिळाले अभिनंदनाचे संदेश | 11-12

**वृत्त सारांश** | 4-5

**अहमदाबाद मेट्रोसह पायाभूत सुविधांशी संबंधित प्रकल्पांना मंजुरी**
केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय | 13

**कौशल्यधारित भारताच्या दिशेने खंबीरपणे पडणारी पावले**
गेल्या 11 वर्षांत देशातील लाखो लोकांना बनवले कुशल आणि सक्षम | 26-27

**तंत्रज्ञानाच्या आधारे परिवर्तनाचे नवीन युग**
फ्लॅगशिप : डिजिटल इंडिया कार्यक्रमाची 11 वर्षे | 28-30

**नव्या भारताच्या मनुष्यबळाचे सक्षमीकरण**
प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेअंतर्गत 56 लाख कर्मचाऱ्यांची नोंदणी झाली आहे | 31

**आधुनिक दळणवळणीय जोडणी आणि विकासाचा नवीन अध्याय**
सूरत-दमनमध्ये 23,000 कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी | 32-34

**शौर्याचा सन्मान...**
संरक्षण अलंकरण सोहळा-1 मध्ये राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 51 शूरवीरांना केले सन्मानित | 35

**जगाला प्रेरित करत आहे भारताची विकास गाथा**
शासी परिषदेच्या बैठकीचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भुषवले अध्यक्षपद | 36-37

**व्यक्तिमत्त्व : गुलजारी लाल नंदा**
कठीण काळात देशाची धुरा सांभाळणारे व्यक्तिमत्व | 38

**1 जुलै, 2026 पासून विकसित भारत जी राम जी अंमलात**



**ग्रामीण भारतात आता**
**125 दिवसांची रोजगार हमी**

जी राम जी अंतर्गत ग्रामीण भागांमधील ज्या कुटुंबातील सज्ञान सदस्य अकुशल शारीरिक श्रमाची मागणी करतील, अशा प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला प्रत्येक आर्थिक वर्षात 125 दिवसांच्या मजुरीवर आधारित रोजगाराची हमी दिली जाईल | 24-25

**प्रकाशक : कंचन प्रसाद,** महासंचालक, सीबीसी (केंद्रीय संचार ब्युरो ) **पत्र व्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता :** खोली क्रमांक -1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली- 110003. **ईमेल - response-nis@pib.gov.in, आर. एन. आय. क्रमांक DELHIN/2020/78812**

# संपादकाच्या लेखणीतून...

# नवीन कायदा, नवीन दिशा

## न्याय व्यवस्थेच्या सक्षमीकरणाचे नवे युग

*सप्रेम नमस्कार.*

आज देश विकसित भारताचा संकल्प साकार करण्यासाठी काम करतो आहे. हा संकल्प साकार करण्यासाठी आपण सर्वांनी पंच प्रण घेतले होते. त्यापैकी एक प्रण असा होता की आपण स्वतःला गुलामीच्या मानसिकतेतून पूर्णपणे मुक्त करू. देशाला भारतीय विचार आणि भारतीय ओळखीसह एक आत्मनिर्भर राष्ट्र बनवू. या प्रणाची पूर्तता करण्याच्या दिशेने सरकारने 1 जुलै, 2024 रोजी वसाहतवादी युगातील तीन कायदे रद्द केले, आणि न्यायाच्या भारतीय संकल्पनेवर आधारित तीन नवीन कायदे लागू केले.

भारतीय दंड संहिता 1860, गुन्हेगारी प्रक्रिया संहिता 1898, आणि भारतीय साक्ष अधिनियम 1872 या कायद्यांच्या जागी देशात भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम लागू करण्यात आले. व्यक्तीचे स्वातंत्र्य, सुरक्षा आणि मानवी हक्कांना प्राधान्य देणे तसेच न्याय व्यवस्था अधिक पारदर्शक, कार्यक्षम आणि समकालीन समाजाच्या गरजांना अनुकूल बनवणे हाच या कायद्यांचा उद्देश आहे. हे कायदे सायबर गुन्हे, संघटित गुन्हेगारी यांसारख्या आधुनिक आव्हानांवर मात करण्यासाठी तसेच अशा परिस्थितीतील पीडित लोकांना न्याय मिळेल याची सुनिश्चिती करण्यासाठी सक्षम आहेत. गेल्या दोन वर्षांत हे तिन्ही कायदे न्याय सुलभतेच्या नवीन युगाच्या रूपात प्रस्थापित झाले आहेत. भारताच्या संपूर्ण न्याय व्यवस्थेत आता भारतीय आत्मा आहे. या दोन वर्षांची ही वाटचालच या अंकातील आमची मुखपृष्ठ कथा बनली आहे.

याशिवाय, व्यक्तिमत्त्व या विभागाअंतर्गत कठीण काळात देशाची धुरा सांभाळणारे गुलजारी लाल नंदा, फ्लॅगशिप विभागाअंतर्गत डिजिटल इंडिया, स्किल इंडिया, विकसित भारत रोजगार योजना, केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय, नीति आयोग प्रशासकीय परिषदेची बैठक, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पंधरवड्यातील कार्यक्रम हे विषय देखील या अंकात अंतर्भूत आहेत.

यासोबतच, नियतकालिकाच्या आतल्या पानावर श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या 6 जुलै रोजीच्या जन्मजयंतीनिमित्त आणि मलपृष्ठावर जय प्रकाश नारायण पक्षी अभयारण्याला 100 वे रामसर स्थळ म्हणून घोषित केल्याबद्दल विशेष साहित्यही (आशय मजकूर) अंतर्भूत केले आहे.

आपण आपल्या सूचना आम्हाला पाठवत राहा.

(धीरेंद्र ओझा)

हे नियतकालिक हिंदी, इंग्रजी आणि इतर 11 भाषांमध्ये उपलब्ध आहे. इथे वाचा / डाउनलोड करा:
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

# तुमची मते...






## मिळते देशाची प्रगती आणि सरकारी उपक्रमांशी संबंधित माहिती

मी न्यू इंडिया समाचार नियतकालिकेची डिजिटल आवृत्ती वाचतो. या नियतकालिकामधून देशाची प्रगती आणि सरकारी उपक्रमांशी संबंधित तपशीलवार माहिती मिळते. मला याचे प्रचंड कौतुक वाटते.

**sachingour231@gmail.com**

## देशाच्या वारशाचा वाटतो अभिमान

मी न्यू इंडिया समाचारच्या ताज्या अंकात जनगणना 2027 वरील मुखपृष्ठ कथा वाचली. या कथेसाठी आपले धन्यवाद! या कथेची मांडणी इतकी तपशीलवार आणि पद्धतशीर होती की केवळ प्रक्रियाच नीट समजावून सांगितलेल्या नाहीत, तर सर्व शंकांचेही निरसन केले आहे. माध्यम जगतातील इतर माध्यमांमुळे अनेक प्रकारच्या शंका उपस्थित होत होत्या, मात्र ही कथा वाचल्यानंतर आता त्या दूर झाल्या आहेत. मला कुमुदिनी लाखिया यांच्याबद्दल वाचूनही खूप चांगले वाटले. मी तुमच्या पथकाचे कौतुक करते की त्यांनी आपल्या देशातील अशा व्यक्तिमत्त्वांचा शोध घेतला, ज्यांच्याबद्दल मी माझ्या मुलांना सांगू शकते आणि आपल्या देशाच्या वारशाचा अभिमान बाळगू शकते.

**शिप्रा अब्राहम**

**shipra.abraham@gmail.com**

## नियतकालिक विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर

मी या नियतकालिकाचा नियमित वाचक नव्हतो परंतु माझ्या शिक्षकांच्या सांगण्यावरून अलीकडेच न्यू इंडिया समाचार नियतकालिकेची मे महिन्याची पहिली आवृत्ती वाचली. हे नियतकालिक विद्यार्थ्यांसाठी किती फायदेशीर आहे हे पाहून मी आश्चर्यचकीतच झालो. या नियतकालिकात यूपीएससीच्या सर्व विषयांबद्दल अचूक आणि तथ्यांवर आधारित माहिती दिलेली आहे. याचा फायदा मला अलीकडेच दिलेल्या प्रशासनाच्या परीक्षेसाठी झाला, कारण या आवृत्तीत यूपीएससीच्या दृष्टीने एक महत्त्वाचा घटक असलेल्या स्वयंसहाय्यता गटांबद्दल तपशीलवार माहिती दिलेली होती. या नियतकालिकात चालू घडामोडींबद्दलची दिलेली माहिती उत्कृष्ट दर्जाची आहे, ही माहिती स्पर्धा परीक्षांसाठी गरजेची असते. मी हे नियतकालिकका वाचून असा निर्धार केला आहे की मी या नियतकालिकेचा नियमित वाचक बनेन. मी हे वाचल्यानंतर इतर लोकांनाही विनंती करेन की तुम्हीही हे नियतकालिक आवडीने वाचा आणि याचा लाभ घ्या.

**वैभव सोनी**

**Vaibhavsoni074@gmail.com**

## माहिती देणारे नियतकालिक वाचण्यासाठी असतो उत्सुक

मी माझ्या घरी नियमितपणे न्यू इंडिया समाचार नियतकालिकेची कन्नड भाषेतील प्रत वाचतो. हे अतिशय माहितीसंपन्न नियतकालिक आहे. मी ते वाचण्यासाठी उत्सुक असतो. हे वाचल्याने कठीण विषय सोप्या पद्धतीने समजून घेण्यास मदत होते. मला ही बाब खूपच उत्तम वाटते. यामुळे मी बऱ्यापैकी अपडेट राहतो.

**कस्तूरी**

**rakeshla143@gmail.com**

पत्रव्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता : खोली क्रमांक - 1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली - 110003.

**ईमेल- response-nis@pib.gov.in**

वृत्त सारांश

## झोजिला बोगदा...

## भारतीय अभियांत्रिकी क्षमतेचा अद्भुत ब्रेक थ्रू

भारत आपल्या अभियांत्रिकी क्षमता आता वारंवार दाखवू लागला आहे. आता भारतात बोगदे केवळ पायाभूत सुविधा विकसित करण्यापुरते मर्यादित राहिलेले नाहीत. तर जे पर्वत आणि दुर्गम भाग जे कधीकाळी दळणवळणात अडथळा ठरत होते, ते भेदून आता भौगोलिक आव्हानांवर मात केली जात आहे. अटल बोगदा, चिनाब पूल, न्यू पंबन पूल आणि बैराबी - सैरांग रेल्वे मार्गाच्या निर्मितीनंतर आता आशियातील सर्वाधिक लांबीच्या झोजिला बोगद्याचा 9 जून रोजी ऐतिहासिक ब्रेक थ्रू झाला. हा ब्रेक थ्रू म्हणजे केवळ बांधकामाच्या प्रक्रियेतील प्रगती नाही, तर भारताची तंत्रज्ञान विषयक सक्षमता, अभियांत्रिकी कौशल्य आणि दृढ संकल्पाचे प्रतीक ठरला आहे. हा प्रकल्प जम्मू-काश्मीर आणि लडाख दरम्यान सर्व ऋतूंमध्ये दळणवळणीय जोडणी देणारा महत्त्वाचा अध्याय ठरू लागला आहे.

धोरणात्मक पायाभूत सुविधांना चालना दिल्याने प्रादेशिक विकास, पर्यटन, व्यापार तसेच राष्ट्रीय सुरक्षेलाही गती मिळेल. या बोगद्याच्या निर्मितीनंतर सोनमर्ग ते मिनामर्ग दरम्यानचा, सुमारे 2 तासांचा प्रवास आता अवघ्या 30 मिनिटांत पूर्ण होईल. राष्ट्रीय महामार्ग-1 वर बालटाल ते मिनामर्ग दरम्यान बांधला जात असलेला आणि सुमारे 14 किमी लांबीचा झोजिला बोगदा, 6,800 कोटी रुपये खर्च करून उभारला जात आहे. या बोगद्याची उभारणी 2,900 मीटर ते 3,310 मीटर उंचीच्या दरम्यान केली जात आहे.




## भारताची सागरी खाद्यान्न निर्यात

## सुमारे 74 हजार कोटी रुपयांच्या सर्वोच्च पातळीवर

आज जागतिक बाजारपेठेची आव्हानात्मक स्थिती असूनही भारताने 2025-26 या आर्थिक वर्षादरम्यान 73,890.46 कोटी रुपये मूल्याच्या 19.72 लाख मेट्रिक टन इतक्या सागरी खाद्यान्नाची निर्यात केली आहे. प्रमाण आणि मूल्य या दोन्हींच्या बाबतीत ही निर्यात सर्वोच्च पातळीवरची आहे. या वर्षी देखील अमेरिका आणि चीन हे भारतीय सागरी खाद्यान्नाचे प्रमुख आयातदार देश राहिले आहेत. प्रमुख निर्यात उत्पादन म्हणून गोठवलेल्या कोळंबीचे स्थान आजही कायम असून, याची 49 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्तीची निर्यात झाली. एकूण निर्यातीतील याचा वाटा 40 टक्क्यांपेक्षा जास्त आहे.



## 3 कोटी लखपती दीदींचे उद्दिष्ट साध्य

देशाने 3 कोटी लखपती दीदींचे उद्दिष्ट साध्य केले आहे. आता आणखी 3 कोटी नवीन लखपती दीदी बनवण्याचा संकल्प युद्ध पातळीवर हाती घेतला गेला आहे. लखपती दीदी हा उपक्रम ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या दिशेने हाती घेतलेली एक परिवर्तनकारी मोहीम ठरला आहे. आता अतिरिक्त 3 कोटी महिलांना शाश्वत आणि वैविध्यपूर्ण उपजीविकेच्या साधनांशी जोडण्यास प्राधान्य दिले जात आहे, यामुळे त्यांच्या उत्पन्नात सातत्यपूर्ण वाढ होत राहील याची सुनिश्चित करता येईल. देशभरात सुमारे 4.11 कोटी भावी लखपती दीदींची निवड निश्चित केली गेली आहे. यामुळे पुढच्या टप्प्यातील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी एक मजबूत पाया रचला गेला आहे.



# प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान : देखभालीचे एक दशक

देशात सुरक्षित प्रसुतींची सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने राबवल्या जात असलेल्या प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाने 10 वर्षे पूर्ण केली आहेत. या निमित्ताने केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा यांनी 9 जून रोजी पीएमएसएमएची 10 वर्षे - देखभालीचे एक दशक या संकल्पनेअंतर्गत एका राष्ट्रव्यापी सोहळ्याचा प्रारंभ केला. हे यश संस्मरणीय ठरावे यासाठी केंद्र सरकारच्या वतीने 75 रुपयांचे एक नाणे आणि 5 रुपयांचे टपाल तिकीटही प्रकाशित करण्यात आले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 9 जून 2016 रोजी या योजनेचा प्रारंभ केला होती. दर महिन्याच्या 9 तारखेला तज्ञ डॉक्टरांद्वारे गरोदर महिलांना मोफत प्रसूतीपूर्व तपासणी आणि आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे. गेल्या एका दशकभराच्या कालावधीत या अभियानाच्या माध्यमातून देशभरात 7.50 कोटींपेक्षा जास्त गरोदर महिलांना मोफत आरोग्य सेवांचा लाभ मिळाला आहे. या अभियानाच्या माध्यमातून एका आरोग्यसंपन्न आणि सुरक्षित भारताच्या उभारणीसाठीचा अत्यंत भक्कम पाया रचला गेला आहे.






## पद्म पुरस्कार-2027 साठी नामांकन अर्जांची मुदत 31 जुलै, 2026 पर्यंत

प्रजासत्ताक दिन 2027 च्या निमित्ताने जाहीर होणाऱ्या पद्म पुरस्कारांसाठीच्या नामांकन अर्जांची अंतिम तारीख 31 जुलै, 2026 आहे. नामांकन अर्ज / शिफारशी केवळ राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर (**https://awards.gov.in**) ऑनलाइन पद्धतीनेच स्वीकारले जातील. पद्म पुरस्कार, म्हणजेच पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री हे देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी एक आहेत. या पुरस्कारांची स्थापना 1954 मध्ये झाली होती. दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने हे पुरस्कार जाहीर केले जातात. कला, साहित्य आणि शिक्षण, क्रीडा, वैद्यकशास्त्र, समाजसेवा, विज्ञान आणि अभियांत्रिकी, जनसंपर्क, नागरी सेवा, व्यापार आणि उद्योग अशा सर्व क्षेत्रांतील वैशिष्ट्यपूर्ण आणि अनन्यसाधारण कामगिरी किंवा सेवेसाठी हे पुरस्कार दिले जातात. केंद्र सरकार पद्म पुरस्कारांना जनतेचे पद्म बनवण्यासाठी वचनबद्ध आहे. यामुळेच तर सर्व नागरिकांना देखील त्यांनी स्वतःहून नामांकन अर्ज / शिफारसी कराव्यात अशी विनंती केली गेली आहे.

## 'भव्य' पोर्टलचा प्रारंभ
## देशभरात 100 औद्योगिक संकुले उभारण्याची प्रक्रिया सुरू

भारत औद्योगिक विकास योजना (भव्य - **BHAVYA**) प्रत्यक्षात अंमलात आणण्याच्या दिशेचे एक महत्त्वाचे पाऊल म्हणून भव्य पोर्टलचा प्रारंभ करण्यात आला आहे. भव्य योजनेअंतर्गत राज्यांना त्यांच्या औद्योगिक क्षमता, जमिनीची उपलब्धता, गुंतवणूकदारांची पसंती आणि प्रादेशिक शक्यता अधोरेखित करत प्रकल्पांचे तपशीलवार प्रस्ताव सादर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाणार आहे. देशभरात 100 औद्योगिक संकुले विकसित करणे हा या योजनेचा उद्देश आहे, यामुळे अधिक गुंतवणुकीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मितीला चालना देता येऊ शकणार आहे. ही संकुले वेगवेगळ्या आकारांत विकसित केले जातील, याअंतर्गत डोंगराळ भाग, छोटे केंद्रशासित प्रदेश आणि ईशान्येकडील राज्यांमध्ये 25 एकरांपासून ते मध्यम आकाराची राज्ये आणि प्रदेशांमध्ये 100 ते 500 एकरांपर्यंत तसेच शहरे आणि नगरांच्या जवळ 1,000 एकरांपर्यंतच्या संकुलांचा समावेश असेल.





पंतप्रधान नरेंद्र मोदी

# सेवा, साहस आणि राष्ट्र उभारणीच्या अविरत साधनेचे प्रतीक



*भारतीय संसदीय इतिहासात 10 जून 2026 या दिवसाची सुवर्णाक्षरांनी नोंद झाली आहे. "राष्ट्र प्रथम" या भावनेने प्रेरित झालेल्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अविरत प्रवासाने आज एक नवा इतिहास रचला. या ऐतिहासिक तारखेला त्यांनी 4,399 दिवसांच्या सेवेचा अखंड कार्यकाळ पूर्ण करत देशात सर्वाधिक प्रदीर्घ कार्यकाळ असणारे निर्वाचित (थेट लोकांमधून निवडून आलेले) पंतप्रधान बनण्याचा बहुमान मिळवला.*

*यापूर्वी हा गौरव, 13 मे 1952 ते 27 मे 1964 या काळात एकूण 4398 दिवस या पदावर विराजमान राहिलेले भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना प्राप्त होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रस्थापित केलेला हा विक्रम केवळ दिवसांच्या गणनेपुरता मर्यादित नसून, देशातील शेतकरी, कामगार, युवक, महिला आणि समाजातील प्रत्येक घटकाने त्यांच्या नेतृत्वावर व्यक्त केलेल्या सखोल श्रद्धा आणि अढळ विश्वासाचे प्रतीक आहे.*

*प्रगतीच्या पथावर अग्रेसर... 12 वर्षांची विकासयात्रा आता एका नव्या युगाचे रूप धारण करत आहे. या यशाबद्दल पंतप्रधान मोदी यांचे अभिनंदन करताना केंद्रीय मंत्रिमंडळाने एकमुखाने एक ठराव मंजूर केला आणि दृढ संकल्प व्यक्त केला की, त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली भारत... स्वावलंबी (आत्मनिर्भर), सुरक्षित, समृद्ध आणि गौरवशाली राष्ट्र म्हणून सातत्याने नवी शिखरे गाठत राहील आणि 2047 पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचा मार्ग अधिक मजबूत करेल.*

## केंद्रीय मंत्रिमंडळाचा ठराव

आज 10 जून 2026 हा दिवस, भारतीय लोकशाहीच्या प्रवासातील एक ऐतिहासिक आणि प्रेरणादायक टप्पा म्हणून नोंदला गेला आहे. आज श्री नरेंद्र मोदीजी, निर्वाचित पंतप्रधान म्हणून सर्वाधिक काळापर्यंत सातत्याने देशाची सेवा करणारे पंतप्रधान बनले आहेत. त्यांनी निर्वाचित पंतप्रधान म्हणून 4,399 दिवसांच्या अविरत सेवेचा विक्रम प्रस्थापित केला आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात असे पहिल्यांदाच घडले आहे. यापूर्वी, जवाहरलाल नेहरूजी यांनी, 1952 पासून ते 1964 पर्यंत, सलग 4,398 दिवसांपर्यंत हे पद भूषवले होते.

हा प्रसंग भारताच्या लोकशाही परंपरेची, लोकविश्वासाची आणि लोकसहभागाच्या सामर्थ्याची प्रचिती देणारा आहे. जेव्हा एखादा लोकनेता 'राष्ट्र प्रथम' या संकल्पनेला जीवनमूल्य मानून कार्य करतो, सत्यनिष्ठा, प्रामाणिकपणा, कठोर परिश्रम आणि सार्वजनिक जीवनातील शुचिता यांना आपल्या कार्याचा आधार बनवतो, तसेच अखंडपणे लोकसेवेसाठी समर्पित राहतो, तेव्हा जनताच त्याला अभूतपूर्व पाठिंबा आणि आशीर्वाद प्रदान करते. आजचा हा ऐतिहासिक क्षण त्याच लोकआशीर्वादाचे प्रतिबिंब आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळ या प्रसंगी माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांचे मनापासून अभिनंदन करते आणि त्यांना हार्दिक शुभेच्छा देत आहे.

10 जून, 2026 चे हे ऐतिहासिक यश, आणखी काही मोठ्या टप्प्यांसह आले आहे. माननीय पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) सरकारलाही 12 वर्षे पूर्ण झाली आहेत. 'हेड ऑफ द गव्हर्नमेंट' (सरकारचे प्रमुख) म्हणून आदरणीय पंतप्रधानजी 25 वर्षे सातत्याने सेवा करण्याचा ऐतिहासिक टप्पाही पार करणार आहेत.

हे देखील उल्लेखनीय आहे की, तब्बल सहा दशकांनंतर, देशाने पंतप्रधान श्री नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली सलग तिसऱ्यांदा एनडीए सरकारला कौल दिला आहे. आपल्याला अभिमान आहे की आपले नेतृत्व अशा कुशल हातांमध्ये आहे, ज्यांच्याकडे संवेदनशीलताही आहे, संयमही आहे, स्पष्ट हेतूही आहे आणि निर्णायक क्षमताही आहे.

माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जीवन, सेवा, साहस आणि राष्ट्र उभारणीच्या एका निरंतर साधनेचे प्रतीक राहिले आहे. संघटनेचे एक समर्पित कार्यकर्ते आणि त्यानंतर एका राज्याचे मुख्यमंत्री म्हणून मिळालेल्या व्यापक अनुभवामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जमिनीवरील वास्तवाशी असलेली घट्ट नाळ धोरणनिर्मितीतही प्रतिबिंबित झाली. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखाली राबवण्यात आलेली धोरणे अधिक संवेदनशील, व्यावहारिक आणि परिणामकारक ठरली आहेत.

2014 या वर्षा मध्ये पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर संसदेच्या केंद्रीय कक्षामध्ये त्यांनी स्वतःला 'प्रधान सेवक' म्हटले होते. त्यांनी देशाच्या संविधानाला पवित्र ग्रंथ मानले होते आणि सरकार गरिबांना



**पंतप्रधानजींच्या प्रेरणेने गेल्या 12 वर्षांत महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाचा एक नवा अध्याय भारताच्या विकास प्रवासात लिहिला गेला आहे**

त्यांच्या मार्गदर्शनाखाली सरकारने नेहमीच देशातील महिलांना आपल्या धोरणांच्या केंद्रस्थानी ठेवले आहे. शौचालयाची सुविधा असो, धूरमुक्त स्वयंपाकघर असो, गरोदरपणाच्या काळातील आर्थिक मदत असो, मुद्रा योजना असो, 'पीएम आवास' महिलांच्या नावावर करणे असो वा 'लखपति दीदी' अभियान असो; जन्मापासून ते जीवनाच्या अंतिम टप्प्यापर्यंत, आयुष्यातील प्रत्येक वळणावर देशातील महिलांसाठी एक संपूर्ण सहाय्यक प्रणाली विकसित करण्यात आली आहे. महिलांना लोकसभा आणि विधानसभांमध्ये 33 टक्के आरक्षणाची तरतूद करून, देशाच्या धोरण निर्मितीमध्ये त्यांचा सहभाग आणखी वाढवण्याचा प्रयत्न झाला आहे.

समर्पित असल्याचेही सांगितले होते. 'सबका साथ, सबका विकास' या मंत्राला शासनाचे ध्येयवाक्य मानून गेली 12 वर्षे विविध धोरणे, योजना आणि उपक्रमांमधून या मंत्राची सातत्यपूर्ण प्रचिती येत राहिली आहे.

पंतप्रधानजींच्या नेतृत्वाखाली भारताने 'गरीब कल्याण' हा प्रशासनाचा केंद्रबिंदू म्हणून प्रस्थापित केला आहे. देशातील कोट्यवधी लोकांपर्यंत पहिल्यांदाच एवढ्या मोठ्या प्रमाणावर पक्की घरे, वीज, गॅस जोडण्या, शुद्ध पिण्याचे पाणी आणि शौचालयांसारख्या सुविधा पोहोचल्या. पहिल्यांदाच कोट्यवधी नागरिकांची बँक खाती उघडली गेली. त्यामुळे कोणत्याही मध्यस्थाशिवाय त्यांना सरकारी मदत थेट मिळू लागली. पहिल्यांदाच 80 कोटींपेक्षा जास्त नागरिकांना मोफत शिध्याची (रेशन) सुविधा मिळाली आणि पहिल्यांदाच 60 कोटींहून अधिक गरिबांना 5 लाख रुपयांपर्यंतच्या मोफत उपचारांची हमी मिळाली. या पावलांमुळे देशवासीयांचा आत्मविश्वास वाढला आणि प्रतिष्ठापूर्वक जगण्याचा विश्वास जागृत झाला. याच प्रयत्नांचे फलित म्हणून 25 कोटींहून अधिक लोक गरिबीवर मात करू शकले.

पंतप्रधानजी हे 'युवा शक्ती'ला भारताचे सर्वात मोठे भांडवल मानतात. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य विकास, स्टार्टअप इंडिया, नवोन्मेष, डिजिटल अर्थव्यवस्था, क्रीडा, उद्योजकता आणि तंदुरुस्ती (फिटनेस) या क्षेत्रांना अभूतपूर्व बळ मिळाले आहे. गेल्या 12 वर्षांत भारत हा जगातील तिसरी सर्वात मोठी नवउद्योग परिसंस्था (स्टार्टअप इकोसिस्टम) बनला आहे आणि आता आपला देश जगातील एक मोठी क्रीडा शक्ती म्हणूनही उदयास येत आहे. भारताने 'मिशन चंद्रयान' अंतर्गत चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर तिरंगा फडकवून जगाला आपल्या वाढत्या वैज्ञानिक क्षमतेची ओळख करून दिली आहे.

आदरणीय पंतप्रधान विकसित भारताच्या ज्या चार स्तंभांबद्दल बोलतात, त्यापैकी एक प्रमुख स्तंभ आपले 'शेतकरी' आहेत. गेल्या 12 वर्षांत शेतकऱ्यांसाठी बियाण्यांचे नवीन वैविध्यपूर्ण वाण, अनेक अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करणे, 'पीएम किसान सन्मान निधी' देणे, हमीभावात (किमान आधारमूल्य-एमएसपी) वाढ आणि सरकारी खरेदीत वाढ यांसारखी अनेक पावले उचलली गेली आहेत. विशेषतः लहान शेतकरी, पशुपालक आणि मच्छिमारांसाठी अभूतपूर्व काम करण्यात आले आहे. पशुपालक आणि मच्छिमारांना 'किसान क्रेडिट कार्ड' देण्याच्या माननीय पंतप्रधानांच्या निर्णयाचा लाभ लाखो लोकांना होत आहे.

आज भारताची कृषी निर्यात वाढून 5 लाख कोटी रुपयांच्या पार गेली आहे. हा माननीय पंतप्रधानांच्या शेतकरी कल्याणाशी संबंधित धोरणांचाच स्पष्ट प्रभाव आहे.

राष्ट्र प्रथम' या भावनेने प्रेरित होऊन पंतप्रधानजी यांनी आवश्यक आणि दूरगामी परिणाम घडवणारे निर्णय घेण्यास कधीही मागेपुढे पाहिले नाही. यामुळेच अनेक दशकांपासून प्रलंबित असलेले महत्त्वपूर्ण निर्णय आणि

सुधारणा प्रत्यक्षात साकार होऊ शकल्या आहेत. जम्मू-काश्मीरमधून कलम 370 हटवणे, वस्तू सेवा कर (जीएसटी) लागू करणे, समान पद-समान निवृत्तिवेतन (ओआरओपी - वन रँक वन पेन्शन) लागू करणे, संरक्षण दल प्रमुख (चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ-सीडीएस) पदाची निर्मिती करणे, गरिबांना 10 टक्के आरक्षण देणे, शत्रू संपत्ती कायदा (एनिमी प्रॉपर्टी ॲक्ट) लागू करणे, नागरिकत्व (सुधारणा) अधिनियम (सीएए-सिटीझनशीप अमेंडमेन्ट ॲक्ट) कायदा बनवणे, तीन तलाक विरुद्ध कायदा करणे, वक्फ कायद्यात सुधारणा करणे, अणुऊर्जा क्षेत्रात सुधारणांसाठी शांतता कायदा करणे, भारतीय न्याय संहिता लागू करणे आणि डझनावारी कामगार कायद्यांचे एकत्रीकरण करून त्यांना चार श्रमसंहितांमध्ये सामावणे, अशा अनेक दूरगामी आणि महत्त्वपूर्ण निर्णयांमुळे माननीय पंतप्रधानांची 'निर्णायक नेतृत्व' असलेली प्रतिमा अधिक बळकट होते.

पंतप्रधानजींनी राष्ट्रीय सुरक्षेला एक नवा आयाम आणि नवी उंची दिली आहे. दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलण्याचे श्रेय त्यांच्याच नेतृत्वाला जाते. पहिल्यांदाच, सीमापार दहशतवादी तळांवर लक्ष्यभेदी हल्ला (सर्जिकल स्ट्राईक) करण्यात आला. पहिल्यांदाच, सीमापार हवाईहल्ला (एअर स्ट्राईक) करण्यात आला. 'ऑपरेशन सिंदूर'च्या माध्यमातून प्रथमच पाकिस्तानातील अशा ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले, ज्यांचा यापूर्वी विचारही केला गेला नव्हता. तसेच, माननीय पंतप्रधानांच्या निर्देशानुसार भारत सरकारने पाकिस्तानसोबत अनेक दशकांपूर्वी झालेला सिंधू जल करार स्थगित ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे भारताच्या जलसंपत्तीचा वापर देशातील शेतकऱ्यांसाठी अधिक प्रभावीपणे करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

माननीय पंतप्रधानांच्या नेतृत्वाखाली भारत नक्षलवादापासून पूर्णपणे मुक्त होत आहे. ईशान्य भारतात विविध स्थायी शांतता करार करण्यात आल्यामुळे तेथील परिस्थितीत लक्षणीय सकारात्मक बदल घडून आला असून, शांतता आणि स्थैर्य अधिक दृढ होत आहे. बांगलादेशसोबतचा अनेक दशकांपासून प्रलंबित असलेला सीमा वादही सोडवण्यात आला आहे.

स्वावलंबी (आत्मनिर्भर) झाल्याशिवाय भारत विकसित होऊ शकत नाही, असा पंतप्रधानजींना ठाम विश्वास आहे. याच प्रेरणेतून, 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' अभियानाला गती मिळाली आहे. आज भारत, संरक्षण, इलेक्ट्रॉनिक्स, वाहन उद्योग, औषधनिर्मिती (फार्मा) अशा अनेक क्षेत्रांमध्ये उत्पादन आणि निर्यातीचे नवे विक्रम रचत आहे. यासोबतच, अर्धसंवाहक (सेमीकंडक्टर), पर्यावरणपूरक उर्जा (ग्रीन एनर्जी), अंतराळ तंत्रज्ञान (स्पेस टेक्नॉलॉजी) आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) या क्षेत्रांतही प्रशंसनीय काम सुरु आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताची जागतिक स्तरावरील उपस्थिती, प्रतिष्ठा आणि धोरणात्मक प्रभाव यांत उल्लेखनीय वाढ झाली आहे. जागतिक व्यासपीठांवर भारताच्या आवाजाला नवी प्रतिष्ठा मिळाली आहे. जी-20 चे यशस्वी अध्यक्षपद, 'ग्लोबल साउथ' च्या आकांक्षांना समर्थपणे वाचा फोडणे, तसेच विविध जागतिक उपक्रमांमध्ये घेतलेल्या अग्रणी भूमिकेमुळे भारताच्या आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेला नवी उंची प्राप्त झाली आहे. पंतप्रधानजींच्या प्रयत्नांमुळे 170 हून अधिक देश एकत्र आले आणि संयुक्त राष्ट्रांनी 21 जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून घोषित केला.



पंतप्रधानजींच्या नेतृत्वाखाली, हवामान बदल आणि शाश्वत विकास या क्षेत्रातही भारताने जगासमोर एक जबाबदार आणि प्रेरणादायक नमुना सादर केला आहे.

भारताने इंटरनॅशनल सोलर अलायन्स (आंतरराष्ट्रीय सौर आघाडी), आपत्ती-प्रतिरोधक पायाभूत सुविधांसाठी आंतरराष्ट्रीय आघाडी (कोएलिशन फॉर डिझास्टर रिझिलियंट इन्फ्रास्ट्रक्चर) आणि जागतिक जैवइंधन आघाडी यांसारखे अनेक जागतिक उपक्रम सुरू केले आहेत. 'मिशन लाईफ' आणि 'एक पेड माँ के नाम' यांसारख्या लोकसहभागावर आधारित उपक्रमांना माननीय पंतप्रधानांनी जागतिक व्यासपीठावर भारताच्या अर्थपूर्ण योगदानाच्या रूपात प्रतिष्ठित केले आहे. 'कॅच द रेन' (पाऊस अडवा) आणि 'अमृत सरोवर' यांसारख्या मोहिमांनी जलसंरक्षणासोबतच तरुण पिढीला या जबाबदारीप्रती जागरूक केले आहे.

भारताच्या इतिहासात प्रथमच विकास आणि सांस्कृतिक वारसा या दोन्हींचा समतोल साधत प्रगतीची वाटचाल होत आहे. यामुळे भारताच्या सांस्कृतिक चेतनेचे पुनरुज्जीवन झाले आहे. माननीय पंतप्रधानांनी देशवासीयांना गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त होण्याचे, राष्ट्रीय अस्मितेचे पुनर्जागरण घडवून आणण्याचे आणि आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा अभिमान बाळगण्याचे आवाहन केले.



आज देश या सर्व प्रयत्नांचे परिणाम प्रत्यक्ष पाहत आहे. नवीन संसद भवन, सेवा तीर्थ, कर्तव्य पथ आणि कर्तव्य भवन यांसारख्या अनेक वास्तू नव्या भारताच्या नव्या आत्मविश्वासाचे प्रतीक बनल्या आहेत. पंतप्रधानजींनी लोकसहभागाला परिवर्तनाचे माध्यम बनवले आहे. 'स्वच्छ भारत अभियान' असो, 'बेटी बचाओ बेटी पढाओ' अभियान असो, किंवा एलपीजी अनुदानाचा स्वेच्छेने त्याग करण्याचे आवाहन असो; हे सर्व उपक्रम गेल्या काही वर्षांत जनतेच्या सामूहिक सहभाग आणि लोकचळवळींची प्रभावी माध्यमे बनले आहेत. लोकसहभागातून घडलेल्या परिवर्तनाच्या याच प्रेरणेमुळे देशाने कोरोनासारख्या अभूतपूर्व महासाथीचा यशस्वीपणे सामना केला. तसेच, आजही 140 कोटी देशवासीय एकजुटीने आणि सामूहिक प्रयत्नांच्या बळावर विविध जागतिक आव्हानांना समर्थपणे तोंड देत आहेत.

केंद्रीय मंत्रिमंडळाने असेही अधोरेखित केले की, गेल्या 12 वर्षांत देशाला लाभलेल्या राजकीय स्थैर्यामुळे विकास प्रक्रियेला अभूतपूर्व गती आणि बळ प्राप्त झाले आहे. गेल्या काही वर्षांत भारताच्या पायाभूत सुविधा क्षेत्राचा झालेला कायापालट आणि विकासाचा वेग हा जगासाठीही एक प्रेरणादायक उदाहरण ठरला आहे. देशातील राजकीय स्थैर्याचा भारताच्या जागतिक प्रभावावर तसेच आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदारांच्या विश्वासावरही सकारात्मक परिणाम झाला आहे.

गेल्या 12 वर्षांत पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाने प्रशासनाला गतिमान दिशा, निर्णयांना पारदर्शकता आणि धोरणांना दूरदृष्टी प्रदान केली. परिणामी, भारताने जगातील सर्वाधिक वेगाने प्रगती करणाऱ्या मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये आपले स्थान भक्कम केले आहे.

## केंद्रीय मंत्रिमंडळ:

1. माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांचे या ऐतिहासिक कामगिरीबद्दल मनःपूर्वक अभिनंदन करते आणि त्यांना हार्दिक शुभेच्छा देते.
2. गरीब कल्याण आणि वंचित घटकांच्या सक्षमीकरणासाठी त्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करते.
3. त्यांच्या नेतृत्वाखाली भारताच्या 25 कोटींहून जास्त गरिबांनी गरिबीवर मात केली आहे, याबद्दल माननीय पंतप्रधानांच्या धोरणांचे कौतुक करते.
4. राष्ट्रसेवेप्रती असलेले त्यांचे अद्वितीय समर्पण आणि अथक परिश्रमांबद्दल आभार (कृतज्ञता) व्यक्त करते.
5. सर्वसमावेशक विकास आणि सामाजिक न्यायाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची प्रशंसा करते.
6. राष्ट्रीय सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी आणि भारताच्या हितांचे रक्षण करण्यासाठी त्यांच्या नेतृत्वाचे कौतुक करते.
7. विकसित भारत' घडवण्याच्या त्यांच्या द्रष्ट्या संकल्पनेला आणि सक्षम नेतृत्वाला आपला संपूर्ण पाठिंबा व्यक्त करते.

आणि याचसोबत,

केंद्रीय मंत्रिमंडळ माननीय पंतप्रधानजींच्या उत्तम आरोग्यासाठी आणि त्यांच्या दीर्घायुष्यासाठी आपल्या सदिच्छा व्यक्त करते.

केंद्रीय मंत्रिमंडळाला हा पूर्ण विश्वास आहे की, माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली भारत एक स्वावलंबी, सुरक्षित, समृद्ध आणि गौरवशाली राष्ट्र म्हणून नवीन उंची गाठत राहील आणि 2047 पर्यंत विकसित भारताच्या ध्येयपूर्तीकडे वाटचाल करण्यासाठी अधिक मजबूत पाया निर्माण करेल.

# ऐतिहासिक नेतृत्व, जागतिक प्रशंसा
# नवा भारत, समर्थ भारत

*लोकशाही मार्गाच्या नेतृत्वाचा एका ऐतिहासिक मैलाचा टप्पा ओलांडत, पंतप्रधान नरेंद्र मोदी भारताचे सर्वाधिक काळ सलग सेवा करणारे पहिले निवडून आलेले पंतप्रधान ठरले आहेत. या अभिमानास्पद प्रसंगानिमित्त, जागतिक नेत्यांनी त्यांचे परिवर्तनशील शासन, सर्वसमावेशक आणि सशक्त भारताची दृष्टी आणि 'ग्लोबल साऊथ'साठीचा बुलंद आवाज झाल्याबद्दल जागतिक मंचावरून पाठवले अभिनंदन आणि शुभेच्छा संदेश...*

भारताचे सर्वाधिक काळ सलग सेवा करणारे लोकशाही व्यवस्थेतून निवडून आलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना जगभरातील नेत्यांकडून शुभेच्छा संदेश मिळाले आहेत. भूतानचे पंतप्रधान शेरिंग तोबगे यांनी आपल्या संदेशात, नरेंद्र मोदी यांचा उल्लेख, मित्र, भाऊ आणि मार्गदर्शक असा केला आहे. तर श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष अनुरा कुमारा दिसनायके यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे. तसेच, दोन्ही देशातील दीर्घकालीन संबंध अधिक बळकट करण्यासाठी श्रीलंका कटिबद्ध असल्याचे म्हटले आहे.



मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे या ऐतिहासिक यशाबद्दल अभिनंदन केले आहे. मोदी यांनी इतकी वर्षे जनतेला समर्पित लोकसेवा आणि नेतृत्वाचे हे प्रमाण असल्याचे त्यांनी म्हटले आहे. समर्पित दोन्ही देशातले द्विपक्षीय संबंध अधिक बळकट करत, दोन्ही देशांसाठी संधींचा विस्तार करण्याप्रती मलेशिया कटिबध्द असल्याचे त्यांनी या संदेशात म्हटले आहे.



नायजेरियाचे राष्ट्राध्यक्ष, बोला अहमद टिनुबू यांनीही पंतप्रधानांचे या उपलब्धीबद्दल अभिनंदन केले आहे. सलग तीन कार्यकाळ भारताच्या जनतेने, त्यांच्या नेतृत्वावर दाखवलेला विश्वास आणि भरवशाचा त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात उल्लेख केला आहे. तसेच, केनियाचे राष्ट्राध्यक्ष, विल्यम समोई रुटो यांनीही, या ऐतिहासिक यशाबद्दल पंतप्रधानांचे अभिनंदन केले आहे.

इटलीच्या पंतप्रधान, जॉर्जिया मेलोनी यांनीही, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे, भारताच्या इतिहासातील सर्वाधिक काळ सलग निवडून आलेले पंतप्रधान म्हणून कार्यकाळ पूर्ण केल्याबद्दल अभिनंदन केले आहे. अलीकडेच, रोम इथे झालेल्या त्यांच्या भेटीचेही, मेलोनी यांनी स्मरण केले आहे. दोन्ही देश आणि देशातल्या जनतेच्या हितासाठी, भारत आणि इटली यांच्यातली विशेष राजनैतिक भागीदारी पुढे नेण्यासाठीची आपली कटिबद्धता त्यांनी व्यक्त केली.



- दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष, ली जे-म्योंग यांनी भारताच्या इतिहासात सर्वाधिक काळ सेवा देणारे पंतप्रधान झाल्याबद्दल मोदींचे अभिनंदन केले.
- डेन्मार्कच्या पंतप्रधान मेटे फ्रेडरिक्सन यांनीही भारताच्या इतिहासात सर्वाधिक काळ सेवा देणारे पंतप्रधान झाल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांचे अभिनंदन केले आहे.



- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनीही, निर्वाचित पंतप्रधान म्हणून सर्वाधिक काळ सेवा दिल्याच्या विक्रमाबद्दल मोदी यांचे अभिनंदन केले आहे.



सायप्रस चे राष्ट्राध्यक्ष, निकोस क्रिस्टोडौलाईस यांनीही, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना इतिहासातील सर्वाधिक काळ पंतप्रधान ठरल्याबदल मोदींचे अभिनंदन केले आहे. त्यांची इतक्या वर्षांची समर्पित सेवा आणि आणि नेतृत्वाचा हा परिणाम असल्याचं, त्यांनी म्हटलं आहे.

- ग्रीसचे पंतप्रधान, किरियाकोस मित्सोताकिस, जर्मनीचे चान्सलर फ्रेडरिक मर्ज, पापुआ न्यू गिनी चे पंतप्रधान जेम्स मारापे यांनीही पंतप्रधानांचे या ऐतिहासिक यशाबद्दल अभिनंदन केले आहे. पंतप्रधान सर्वांसाठी एक रोल मॉडेल आणि नेतृत्वाचे आदर्श आहेत, असे त्यांनी म्हटले आहे.



- त्रिनिदाद आणि टोबॅगोच्या पंतप्रधान कमला प्रसाद-बिसेसर यांनी म्हटले आहे, की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत, जागतिक प्रश्नांवरचा एक महत्वाचा आवाज म्हणून उदयाला आला आहे.




केंद्रीय मंत्रिमंडळ निर्णय

# अहमदाबाद मेट्रोसह पायाभूत सुविधांशी संबधित प्रकल्पांना मंजुरी

*एनडीए सरकारच्या १२ वर्षांच्या कार्यपूर्तीच्या निमित्ताने १० जून रोजी झालेल्या बैठकीत केंद्रीय मंत्रिमंडळाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना, देशातील सर्वाधिक काळ सेवा देणारे निवडून आलेले पंतप्रधान ठरल्याबद्दल अभिनंदन करणारा ठराव मंजूर केला. तसेच, या बैठकीत अहमदाबाद मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या विस्तारासह पायाभूत सुविधांशी संबंधित अनेक महत्त्वाच्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली...*

**निर्णय : अहमदाबाद मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या टप्पा २-अ (कोटेश्वर मार्ग ते विमानतळ कॉरिडॉर) ला मंजुरी.**

**परिणाम :** या कॉरिडॉरची लांबी 6.032 किलोमीटर असून त्यामध्ये 5 स्थानकांचा समावेश आहे (चार उन्नत आणि एक भूमिगत). टप्पा 2-अ पूर्ण झाल्यानंतर अहमदाबाद-गांधीनगर मार्गावरील कार्यरत मेट्रो जाळ्याची एकूण लांबी 77 .63 किलोमीटर होईल. या प्रकल्पाची एकूण किंमत 2,169.04 कोटी रुपये आहे. या कॉरिडॉरचा उद्देश, विमानतळाशी अखंड संपर्क सुविधा उपलब्ध करून देणे तसेच प्रमुख निवासी आणि व्यावसायिक भागांना जोडून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करणे हा आहे. या प्रकल्पामुळे दळणवळण सुविधा सुधारतील, वाहतूक कोंडी कमी होईल, पर्यारणासाठी लाभदायक ठरेल, आर्थिक विकासाला चालना मिळेल आणि नागरिकांच्या जीवनमानातही सुधारणा होईल.

**निर्णय : आंध्र प्रदेशची नवी राजधानी अमरावती इथे जनरल पूल रेसिडेन्शियल ॲकमोडेशन (GPRA) बांधकामास मंजुरी.**

**परिणाम :** अमरावती राजधानी शहर तसेच संपूर्ण आंध्र प्रदेशातील हा पहिलाच जीपीआरए प्रकल्प आहे. केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांना पुरेशी निवासी सुविधा उपलब्ध करून देऊन त्यांच्यावरील आर्थिक भार कमी करणे आणि त्यांचे मनोधैर्य वाढवणे, हा या प्रस्तावाचा उद्देश आहे. याशिवाय, कर्मचाऱ्यांना त्यांच्या कार्यस्थळांच्या जवळ राहण्याची सुविधा मिळाल्याने शासकीय कामकाज अधिक कार्यक्षम होण्यास मदत होईल. कर्मचारी त्यांच्या अधिकृत जबाबदाऱ्यांचे प्रभावीपणे पालन करण्यासाठी सदैव उपलब्ध राहतील, याचीही खात्री या प्रकल्पामुळे मिळेल. या प्रकल्पासाठी अपेक्षित खर्च, 1 234. 91 कोटी रुपये असून प्रकल्पाच्या बांधकामाच्या टप्प्यात दरवर्षी सुमारे सात लाख मानव-दिवस रोजगारनिर्मिती होण्याचा अंदाज आहे.

**निर्णय : राजधानी अमरावती इथे नवीन केंद्रीय सरकारी जनरल पूल कार्यालय संकुलाच्या बांधकामास मंजुरी.**

**परिणाम :** जागतिक दर्जाचे शहरी केंद्र म्हणून विकसित करण्याची संकल्पना असलेल्या अमरावती या नव्या ग्रीनफिल्ड शहरातील हा एक महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक उपक्रम आहे. विविध केंद्रीय सरकारी कार्यालयांसाठी वाढत्या कार्यालयीन जागेच्या गरजा पूर्ण करणे आणि त्यांना एकाच छताखाली आणणे हा या प्रस्तावाचा उद्देश आहे. या एकत्रीकरणामुळे विविध विभागांमधील समन्वय वाढेल तसेच आंध्र प्रदेशाला केंद्र सरकारकडून पुरविल्या जाणाऱ्या सेवांची कार्यक्षमता आणि परिणामकारकता सुधारेल. बांधकामाच्या कालावधीत दरवर्षी सुमारे सात लाख मानव-दिवस रोजगारनिर्मिती होण्याचा अंदाज असून या प्रकल्पासाठी अपेक्षित खर्च, सुमारे 1,299.08 कोटी रुपये आहे. ▪

मंत्रिमंडळ निर्णयासंबंधीची पत्रकार परिषद बघण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

मुखपृष्ठ कथा

न्याय संहितेची दोन वर्षे

# स्वदेशी न्याय व्यवस्था

## नवी पहाट, नवी दिशा



*न्याय हा केवळ एक शब्द नाही, तर सुसंस्कृत समाजाच्या पायाभरणीतील व्यापक मूल्य आहे. याच विचारातून १ जुलै २०२४ रोजी भारताने वसाहतवादी मानसिकतेचे प्रतीक असलेल्या आणि दीडशे वर्षांपासून शिक्षेला केंद्रस्थानी ठेवणाऱ्या तीन जुन्या कायद्यांना निरोप दिला. दोन वर्षांपूर्वी लागू झालेल्या भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम यांनी पूर्णपणे स्वदेशी दृष्टिकोन स्वीकारत 'शिक्षेऐवजी न्याय' या नव्या युगाची सुरुवात केली. जवळपास दोन शतकांचा दुरावा दूर करत २१व्या शतकातील भारताला गुलामगिरीच्या सावटातून मुक्त अशी स्वतःची न्यायव्यवस्था लाभली. याचाच परिणाम म्हणून नागरिक, पोलीस आणि न्यायालये यांच्यासाठी गेल्या दोन वर्षांत न्यायाची भाषा आणि स्वरूप दोन्ही बदलले आहे. या परिवर्तनामुळे देशातील सर्वसामान्य जनता स्वदेशी न्यायव्यवस्थेचा नवा सूर्योदय अनुभवत आहे...*



1. चंदीगडमधील वाहन चोरीच्या एका प्रकरणात एफआयआर नोंदविल्यानंतर अवघे 2 महिने 11 दिवसांत न्यायालयाने आरोपीला शिक्षा सुनावली. याशिवाय, परिसरात अशांतता निर्माण केल्याच्या आणखी एका प्रकरणात न्यायालयाने संपूर्ण सुनावणी पूर्ण करून केवळ 20 दिवसांत आरोपीला शिक्षा सुनावली.

2. दिल्लीतील एका फौजदारी प्रकरणात एफआयआर नोंदविण्यापासून अंतिम निकाल लागेपर्यंत केवळ 60 दिवसांचा कालावधी लागला. या प्रकरणात दोषी आरोपीला 20 वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली.

3. बिहारमधील छपरा इथे घडलेल्या हत्या प्रकरणात एफआयआर नोंदविण्यापासून आरोपपत्र (चार्जशीट) दाखल होईपर्यंत फक्त 14 दिवसांचा कालावधी लागला. त्वरित आणि परिणामकारक न्यायप्रदानाच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

नवीन कायद्यांची सर्व राज्यांमध्ये संपूर्ण अंमलबजावणी करण्याची अंतिम मुदत 3 वर्षे निश्चित करण्यात आली आहे, परंतु गेल्या 2 वर्षांत या बदलाला मिळालेले यश समाधानकारक आहे. ही काही उदाहरणे भारतीय न्याय संहितेची शक्ती आणि प्रभाव दर्शवतात. हा बदल दाखवतो की जेव्हा एखादे सरकार सामान्य नागरिकांच्या हितासाठी समर्पित असते आणि त्यांच्या समस्या प्रामाणिकपणे व सचोटीने सोडवू इच्छिते, तेव्हा असे जलद परिणाम साधले जातात. याचाच परिणाम म्हणून आज नवीन भारत न्यायाच्या एका नव्या युगाचा साक्षीदार होत आहे. देशातील नागरिकांना आज जाणीव झाली आहे की, 'शिक्षा नव्हे, तर न्यायच सर्वोच्च आहे' आणि नव्या भारताचे नवे कायदे आता त्यांना न्याय देण्यासाठीच आहे. स्वतंत्र भारताच्या तीन ऐतिहासिक कायद्यांनी न्यायव्यवस्थेचे स्वरूप बदलून टाकले आहे, जी आता 'नागरिक प्रथम - न्याय प्रथम' या तत्त्वावर आधारित आहे. हे कायदे पूर्णपणे नागरिक-केंद्रित, सर्वांसाठी सुलभ आणि भारतीय मूल्यांवर आधारित आहेत.

भारतीयत्वाच्या भावनेने ओतप्रोत असलेले हे तीन नवीन कायदे, डिजिटल प्रक्रियांसह वेळेवर न्याय मिळण्याचे प्रतीक बनले आहेत. केवळ गेल्या दोन वर्षांतील कामगिरी पाहता, एप्रिल 2026 पर्यंत भारतीय न्याय संहितेअंतर्गत 63 लाखांहून अधिक प्रथम माहिती अहवाल (एफ आय आर) नोंदवण्यात आले, त्यापैकी सुमारे 52 लाख प्रकरणांमध्ये आरोपपत्रे किंवा अंतिम अहवाल सादर करण्यात आले. शिवाय, पूर्वीच्या कायद्यानुसार 60 दिवसांच्या आत आरोपपत्रे किंवा अंतिम अहवाल दाखल करण्याचा दर सुमारे 50 टक्के होता, जो नवीन कायद्यामुळे गेल्या दोन वर्षांत 61 टक्क्यांहून अधिक झाला आहे. ज्या प्रकरणांमध्ये जुन्या कायद्यानुसार 90 दिवसांच्या आत आरोपपत्र दाखल करणे आवश्यक होते, त्या प्रकरणांमध्ये आरोपपत्र दाखल करण्याचा दर अंदाजे 39 टक्के होता, तो आता 51 टक्क्यांहून अधिक झाला आहे. या दोन वर्षांत शून्य एफआयआरची संख्याही जवळपास 60 हजारांवर पोहोचली आहे. कायद्यातील बदलाचा परिणाम लैंगिक गुन्ह्यांसारख्या संवेदनशील प्रकरणांमध्ये स्पष्टपणे दिसून येतो. जुन्या कायद्यानुसार 2018 मध्ये लैंगिक गुन्ह्यांमधील दोन महिन्यांच्या आत आरोपपत्र दाखल करण्याचा अनुपालन दर 44 टक्के होता, जो आता वाढून 71 टक्के झाला आहे. न्यायवैद्यक क्षमतांचा झपाट्याने विस्तार झाला आहे.

## वेळेवर न्याय हा आता पहिला निकष

न्यायासाठीचा पहिला निकष म्हणजे वेळेवर न्याय मिळणे. तुम्ही ऐकले असेल -Justice delayed, Justice denied म्हणजेच, न्यायास उशीर होणे हे न्याय न मिळण्यासारखेच आहे. यामुळेच भारतीय न्याय




> *भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023, भारतीय न्याय संहिता, 2023 आणि भारतीय साक्ष्य अधिनियम, 2023 हे आपल्या इतिहासातील महत्त्वपूर्ण क्षण आहेत. या कायद्यांनी वसाहतवादी कायद्यांचा अंत केला आहे. सार्वजनिक सेवा आणि कल्याणावर लक्ष केंद्रित करणाऱ्या कायद्यांसह एका नवीन युगाची सुरुवात केली आहे. हे भारताच्या सुधारणावादी वचनबद्धतेचे प्रतीक आहे.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



संहिता आणि नागरिक सुरक्षा संहितेच्या माध्यमातून जलद न्यायाच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलण्यात आले आहे.

त्वरेने आरोपपत्र दाखल करणे आणि त्वरेने निकाल देणे याला प्राधान्य देण्यात आले आहे. खटल्याचा प्रत्येक टप्पा पूर्ण करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे, कारण 'नागरिक प्रथम' हे भारतीय न्याय संहितेचे मूळ तत्व आहे. शून्य एफआयआरला दृढपणे कायद्याचे रूप देण्यात आले आहे. या नवीन कायद्याचा आणखी एक मानवतावादी पैलू म्हणजे कोणालाही शिक्षेशिवाय तुरुंगात दीर्घकाळ ठेवता येणार नाही. आता तीन वर्षांपेक्षा कमी शिक्षेच्या गुन्ह्यांमध्ये केवळ वरिष्ठ अधिकाऱ्याच्या संमतीनेच अटक केली जाऊ शकते. किरकोळ गुन्ह्यांसाठी सक्तीच्या जामिनाची तरतूद करण्यात आली आहे. साध्या गुन्ह्यांमध्ये समाजसेवेचा पर्यायही ठेवण्यात आला आहे, ज्यामुळे आरोपीला समाजाच्या हितासाठी सकारात्मक दिशेने पुढे जाण्याची एक नवीन संधी मिळेल. न्यायसंहिता पहिल्यांदाच गुन्हा करणाऱ्यांसाठीही संवेदनशील आहे.भारतीय न्याय संहिता आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहिता प्रत्येक पीडित व्यक्तीच्या बाबतीत अत्यंत संवेदनशील आहेत. भारतीय न्याय संहिता हे सुनिश्चित करते की कायदा पीडितांच्या पाठीशी उभा राहील. आरोप दाखल करण्यासाठी आणि निकाल देण्यासाठी कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे जुन्या कायद्यांनुसार तुरुंगवास भोगत असलेल्या हजारो कैद्यांची तुरुंगातून सुटका झाली आहे. यावरून हे सिद्ध होते की एक नवीन व्यवस्था, एक नवीन कायदा नागरी हक्कांच्या सक्षमीकरणाला कशी चालना देऊ शकतो.

## लोकशाहीची मूळ भावना झाली पुनर्स्थापित

विकसित भारताच्या दिशेने राष्ट्र वाटचाल करत असताना या कायद्यांची गरज समजून घ्या. देशाला 1947 मध्ये स्वातंत्र्य मिळाले, परंतु इंग्रजांच्या काळात तयार झालेले कायदे आजही अस्तित्वात आहेत. हे कायदे म्हणजे इंग्रजांची दडपशाही आणि शोषणाची साधने होती. हे कायदे तेव्हा लागू करण्यात आले होते जेव्हा इंग्रजी सत्तेला भारतावरील आपली पकड कायम ठेवण्यासाठी ते कोणत्याही थराला जायला तयार होते. याचे कारण

# न्यायिक सुलभतेचे
# नवे युग




*19 व्या शतकात तयार झालेल्या इंग्रज सरकारच्या कायद्यांपासून मुक्ती मिळाली. 21 व्या शतकातील सर्वात मोठ्या सुधारणेनंतर भारताला स्वतःचे कायदे मिळाले ज्यात आहे न्याय, समानता आणि निष्पक्षतेचा मूलमंत्र. हे खऱ्या अर्थाने नव्या भारताच्या आत्म्याचे आणि संविधानाच्या तत्त्वांचे प्रकटीकरण आहे.*

## शिक्षा नव्हे तर न्याय देण्याचा उद्देश

- 150 वर्षे जुन्या ब्रिटिशकालीन कायद्यांपासून मुक्ती.
- या कायद्यांची पूर्ण अंमलबजावणी झाल्यानंतर, देशभरातील कोणत्याही एफआयआरवर सर्वोच्च न्यायालयापर्यंत अंदाजे 3 वर्षांत न्याय मिळेल.
- नवीन कायद्यांमध्ये तपास पूर्ण करणे, आरोपपत्र दाखल करणे, आरोप निश्चित करणे आणि निकाल देणे यासाठी कालमर्यादा देखील निश्चित करण्यात आली आहे.
- सात वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षेच्या सर्व गुन्ह्यांसाठी न्यायवैद्यक तपास अनिवार्य करण्यात आला आहे.

### दहशतवाद आणि संघटित गुन्हेगारीवर कठोर कारवाई

भारतीय न्याय संहिता, 2023 मध्ये संघटित गुन्हेगारी आणि दहशतवादासाठी कठोर अंमलबजावणीची तरतूद आहे.



असेही होते की 1857 च्या पहिल्या स्वातंत्र्ययुद्धाने ब्रिटिश साम्राज्याची मुळे हादरवून टाकली होती. त्यामुळे देशाच्या कानाकोपऱ्यात एक आव्हान निर्माण झाले होते. याला प्रतिसाद म्हणून ब्रिटिशांनी 1860 मध्ये आयपीसी आणि त्यानंतर काही वर्षांनी सीआरपीसी लागू केली. हे तीन कायदे देशाच्या नागरिकांसाठी नव्हे, तर ब्रिटिश राजवटीच्या संरक्षणासाठी बनवले गेले होते. त्यावेळच्या कायद्यांमागील विचार त्यांच्या आकड्यांवरून स्पष्ट होतो. त्या कायद्यात हत्या आणि महिलांवरील अत्याचार यांसारख्या घृणास्पद गुन्ह्यांपेक्षा सरकारी तिजोरी लुटणे, रेल्वे रुळ उखडणे आणि ब्रिटिश राजमुकुटाचा अपमान करणे यांसारख्या गुन्ह्यांच्या शिक्षेला अधिक महत्त्व देण्यात आले होते.

ही दुर्दैवाची गोष्ट होती की स्वातंत्र्यानंतर बराच काळ भारतीय कायदे एकाच दंड संहितेभोवती फिरत होते. जरी त्यात वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या तरी त्यांचे मूलभूत स्वरूप तेच राहिले. ब्रिटिशकाळात लागू केलेल्या कायद्यांचा आत्मा ब्रिटिश राजवट मजबूत करण्यावर केंद्रित होता. ते कायदे त्या वसाहतवादी राजवटीचे संरक्षण करण्यासाठी तयार केले गेले होते. त्यांचा उद्देश शिक्षा देणे हा होता, न्याय देणे नव्हे. अशा परिस्थितीत जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाल किल्ल्याच्या तटबंदीवरून देशाला गुलामगिरीच्या मानसिकतेतून मुक्त करण्याचा आपला निर्धार व्यक्त केला, तेव्हा न्याय संहितेतील बदल हे त्या दिशेने एक निर्णायक पाऊल ठरले. अमृतकाळात भारताचा विकास करण्याच्या भव्य संकल्पासोबतच, गुलामगिरीच्या सर्व चिन्हांपासून मुक्ती मिळवण्याच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या राष्ट्राने जुलै 2024 मध्ये भारतीय न्याय संहिता लागू करून एक दूरगामी उपक्रम राबवला. भारतीय दंड संहिता 1860, फौजदारी प्रक्रिया संहिता 1898 आणि भारतीय पुरावा कायदा 1872 हे कायदे ब्रिटिश संसदेने संमत केले होते. आता भारतीय न्याय संहितेने भारतीय दंड संहिता 1860 ची, भारतीय नागरिक सुरक्षा संहितेने फौजदारी प्रक्रिया संहिता 1898 ची आणि भारतीय साक्ष्य अधिनियमाने भारतीय पुरावा कायदा 1872 ची जागा घेतली आहे.

आता हे तीन नवीन कायदे शिक्षेवर नव्हे, तर न्यायावर केंद्रित असलेल्या फौजदारी न्यायव्यवस्थेचा पाया बनले आहेत. जेव्हा न्यायाची चर्चा होते तेव्हा ती आरोपी आणि पीडित या दोघांनाही सामावून घेणाऱ्या व्यापक समाजापर्यंत विस्तारते. मात्र जेव्हा शिक्षेचा उल्लेख होतो तेव्हा केवळ आरोपीचाच विचार केला जातो. पण आता एका साध्या, सुसंगत, पारदर्शक आणि उत्तरदायी प्रक्रियेद्वारे 'न्यायाची सुलभता' साकार झाली आहे. आज हे तीन नवीन कायदे भारतीय न्याय संहितेच्या भावनेचे प्रकटीकरण आहेत. खऱ्या अर्थाने, स्वातंत्र्याच्या इतक्या दशकांनंतर प्रथमच या तीन फौजदारी कायद्यांद्वारे न्यायव्यवस्थेचे मानवीकरण झाले आहे. ही न्याय संहिता आज लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वाला - 'लोकांचे, लोकांकडून, लोकांसाठी' - सशक्त करत आहे. स्वतंत्र




कर्तव्य पथावर एक झलक... शिक्षेपासून न्यायापर्यंत

> 21 व्या शतकातील सर्वात मोठ्या सुधारणा म्हणजे आपल्या फौजदारी न्यायव्यवस्थेतील तीन नवीन कायदे. 'नागरिक प्रथम', 'सन्मान प्रथम' आणि 'न्याय प्रथम' ही मूलभूत तत्त्वे नवीन फौजदारी कायद्यांचा पाया आहेत. आज आपले पोलीस लाठीऐवजी डाटा आणि थर्ड डिग्रीऐवजी वैज्ञानिक पुरावे यांच्या आधारे काम करतात.
>
> **-अमित शाह, केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री**

भारताची न्याय संहिता समानता, सलोखा आणि सामाजिक न्याय या विचारांमधून विणलेली आहे. कायद्यासमोर सर्वजण समान आहेत असे नेहमी म्हटले जाते, परंतु व्यावहारिक वास्तव खूप वेगळे आहे. गरीब आणि दुर्बळ लोकांना कायद्याची भीती वाटत असे. ते न्यायालये आणि पोलीस ठाण्यांमध्ये पाऊल ठेवण्यास घाबरत असत. पण आता भारतीय न्याय संहिता समाजाची ही मानसिकता बदलत आहे. देशाचा कायदा समानतेची हमी देतो, यावर लोकांचा विश्वास बसू लागला आहे. हाच खरा सामाजिक न्याय आहे, ज्याची हमी संविधानात देण्यात आली आहे.

## जनतेमध्ये सुरक्षिततेची भावना झाली दृढ

कोणत्याही देशाची खरी शक्ती त्याच्या लोकांमध्ये असते आणि या लोकांना आपली शक्ती देशाच्या कायद्यांमधून मिळते. म्हणूनच नागरिक अभिमानाने सांगतात की ते कायद्याचे पालन करतात. कायद्याप्रती असलेली ही निष्ठा राष्ट्राची सर्वात मोठी संपत्ती असते. कोणताही नियम किंवा कायदा तेव्हाच प्रभावी ठरतो, जेव्हा तो काळाला सुसंगत असतो. आज जग झपाट्याने बदलत आहे. गुन्हे आणि गुन्हेगारांच्या पद्धती बदलल्या आहेत. अशा परिस्थितीत 19 व्या शतकातील व्यवस्था आता व्यावहारिक राहिलेली नाही. त्यामुळे या कायद्यांचे भारतीयीकरण करण्यासोबतच त्यांचे आधुनिकीकरणही करण्यात आले आहे. डिजिटल पुरावा आता एक महत्त्वपूर्ण पुरावा मानला जातो. तपासादरम्यान पुराव्यामध्ये

# डिजिटल प्रक्रियेद्वारे वेळेवर न्याय

## नवीन कायद्याची 2 वर्षे, उपलब्धी

**कालमर्यादा + तंत्रज्ञान = विश्वास**

60 दिवसांत आरोपपत्र/अंतिम अहवाल अनुपालन दर

**50.92%** 2024

**61.11%** 2026




**39.56%** 2024

**51.28%** 2026

90 दिवसांत आरोपपत्र/अंतिम अहवाल अनुपालन दर

BNS अंतर्गत FIR
**63.08** लाख



आरोपपत्र/अंतिम अहवाल
**51.95** लाख

**35.06** लाख
ई-साक्ष्यच्या माध्यमातून साक्ष्य ID निर्मिती

**59,572** एकूण शून्य FIR दाखल





1 जुलै 2024 ते 30 एप्रिल 2026 पर्यंतची आकडेवारी

कोणताही फेरफार होऊ नये, हे सुनिश्चित करण्यासाठी संपूर्ण प्रक्रियेची व्हिडिओग्राफी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. न्यायालये आणि पोलीस आता थेट फोनवरून इलेक्ट्रॉनिक पद्धतीने समन्स जारी करू शकतात. साक्षीदारांच्या जबाबांचे ऑडिओ-व्हिडिओ रेकॉर्डिंग केले जाऊ शकते. डिजिटल पुरावा न्यायालयात ग्राह्य धरला जातो आणि तो न्यायाचा पाया बनत आहे. यामुळे गुन्हेगार पकडला जाईपर्यंत वाया जाणारा अनावश्यक वेळ टळतो. हे बदल राष्ट्रीय सुरक्षेसाठीही आवश्यक होते. डिजिटल पुरावा आणि तंत्रज्ञानाचे एकत्रीकरण दहशतवादाविरुद्धच्या लढ्यात मदत करत आहे. नवीन कायद्यांनुसार, दहशतवादी आणि दहशतवादी संघटना कायद्यातील गुंतागुंतीचा गैरफायदा घेऊ शकत नाहीत.

या कायद्यांमुळे प्रत्येक विभागाची कार्यक्षमता वाढली आहे. शिवाय, देशाच्या प्रगतीला वेग आला आहे. कायदेशीर अडथळे दूर झाल्यामुळे भ्रष्टाचार कमी झाला आहे. याचा परिणाम गुंतवणुकीवरही होत आहे. पूर्वी गुंतवणूकदार भारतात गुंतवणूक करण्यास तयार नसत कारण कोणी खटला सुरू झाला तर त्यातच अनेक वर्षे निघून जातील, ही भीती आता संपली आहे. यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेलाही बळ मिळत आहे.

### दोन महिन्यांच्या आत लैंगिक गुन्ह्यांमध्ये आरोपपत्र दाखल करण्याच्या अंमलबजावणीचा दर




### न्यायवैद्यक क्षमतेचा विस्तार

**16** राष्ट्रीय न्यायवैद्यक विज्ञान विद्यापीठ (एनएफएसयू) प्रस्तावित/संचालित 9 स्थापन + 7 अतिरिक्त मंजूर

**15** केंद्रीय न्यायवैद्यक विज्ञान प्रयोगशाळा (सीएफएसएल) प्रस्तावित/संचालित 7 स्थापन + 8 अतिरिक्त मंजूर

**7+ वर्षे** शिक्षेच्या गंभीर गुन्ह्यांमध्ये न्यायवैद्यक तज्ज्ञांची भूमिका अनिवार्य/ महत्त्वपूर्ण



> *नव्या फौजदारी कायद्यांमध्ये प्रथमच दहशतवाद, संघटित गुन्हेगारी आणि मॉब लिंचिंग यांची स्पष्ट व्याख्या करण्यात आली आहे. तसेच पोलीस, न्यायालय आणि खटला या तिन्हीसाठी प्रथमच निश्चित कालमर्यादा ठरविण्यात आली आहे. पोलीस, कारागृह, न्यायालय, खटला आणि न्यायवैद्यक या न्यायव्यवस्थेच्या पाच स्तंभांना ऑनलाइन जोडले आहे.*
>
> ***-अमित शाह, केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री***

### व्यापक चिंतनातून घडलेली स्वतंत्र भारताची स्वतःची संहिता

संविधानाच्या 75 वर्षांच्या निमित्ताने 1 जुलै 2024 रोजी संविधानाच्या मूल्यांनी प्रेरित भारतीय न्याय संहितेची अंमलबजावणी ही एक ऐतिहासिक सुरुवात ठरली. संविधानातील आदर्श प्रत्यक्षात उतरविण्याच्या दिशेने हा एक ठोस प्रयत्न होता. भारताची नवी न्याय संहिता जितकी व्यापक आणि सर्वसमावेशक आहे, तितकीच तिची निर्मिती प्रक्रिया देखील व्यापक राहिली आहे. या प्रक्रियेत देशातील अनेक नामांकित संविधानतज्ज्ञ आणि कायदेतज्ज्ञांच्या कष्टाचे योगदान आहे.

या कायद्यात भारतीयत्वाचा आत्मा रुजवण्यासाठी केंद्र सरकारने 2019 पासूनच व्यापक सल्लामसलत सुरू केली. या प्रक्रियेत सर्व उच्च न्यायालयांचे मुख्य न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, विधी विद्यापीठ, खासदार, सर्व मुख्यमंत्री व राज्यपाल, केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासक, विविध विद्वान आणि सर्वसामान्य नागरिकांशी चर्चा करण्यात आली. याशिवाय बेजबरुआ समिती, विश्वनाथन समिती, मलीमथ समिती, माधव मेनन समिती आणि गृह मंत्रालयाशी संबंधित संसदीय स्थायी समितीच्या वर्ष 2011, 2005 आणि 2006 मधील 111वा, 110वा व 146वा अहवाल, तसेच सर्व राज्यपाल व मुख्यमंत्री, आमदार, खासदार, न्यायाधीश, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय आणि विधी विद्यापीठांकडून आलेल्या सर्व सूचनांचा सखोल विचार करण्यात आला. केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी स्वतः या कायद्याचा मसुद्यातील प्रत्येक शब्द आणि ओळ न् ओळ तपासून त्याचा आराखडा तयार केला. संसदेची मंजुरी मिळाल्यानंतर आणि राष्ट्रपतींची मान्यता मिळाल्यावर हा कायदा लागू करण्यासाठी व्यापक स्तरावर जनजागृती मोहीम राबविण्यात आली. देशातील प्रत्येक नागरिकाची स्वतंत्र



# नव्या कायद्यांमध्ये काही कलमे काढून टाकली तर काही कलमांचा नव्याने समावेश

*केंद्र सरकारने नवीन फौजदारी न्याय सुधारणा कायद्यांमध्ये प्राधान्यक्रमाबाबत महत्त्वाचे बदल केले आहेत. कारण भारतीय दंड संहिता 163 वर्षांपासून, गुन्हेगारी दंड संहिता 125 वर्षांपासून आणि पुरावा कायदा 150 वर्षांपूर्वी ब्रिटिश संसदेने तयार केला होता, त्यानुसारच वापरात राहिला होता. भारतीय न्याय संहितेमध्ये महिला, मुले आणि राष्ट्राविरुद्धच्या गुन्ह्यांशी संबंधित कलमांना सर्वात आधी स्थान देण्यात आले आहे. हे वसाहतवादी काळातील कायद्यांपेक्षा पूर्णपणे वेगळे आहे. जुन्या कायद्यात राजद्रोह आणि तिजोरीची लूट, शासनाच्या अधिकाऱ्यांवर हल्ले अशा घटनांशी संबंधित कलमांना अधिक महत्त्वाच्या स्थानी ठेवण्यात आले होते.*




**358** कलमे भारतीय न्याय संहितेत आहेत. यापूर्वी भारतीय दंड संहिता, 1860 मध्ये 511 कलमे होती.

**21** नव्या गुन्हा कलमांचा समावेश केला आहे.



**41** कलमांमध्ये तुरुंगवासाची शिक्षा वाढविण्यात आली आहे.

**82** गुन्ह्यांशी संबंधित दंडाची रक्कम वाढविण्यात आली असून 25 गुन्ह्यांमध्ये किमान अनिवार्य शिक्षेची तरतूद प्रथमच केली आहे.

**19** कलमे रद्द केली आहेत. सहा गुन्ह्यांसाठी ‘सामुदायिक सेवा’ हा शिक्षेचा पर्याय समाविष्ट केला आहे.

भारताच्या स्वतःच्या कायद्याशी ओळख व्हावी असा या मोहिमेचा उद्देश होता.

स्वातंत्र्यानंतरच्या सात दशकांत न्यायव्यवस्थेसमोर उभ्या राहिलेल्या सर्व आव्हानांवर चिंतन करण्यात आले. प्रत्येक कायदा व्यावहारिक बाजू आणि भविष्यातील गरजांच्या निकषांवर तपासण्यात आला. या समुद्रमंथनासारख्या प्रक्रियेतून अमृत काळात भारतीय न्याय संहिता ही अमृतधारा म्हणून समोर आली.

प्रचंड सहकार्यातून तयार झालेल्या भारताच्या न्याय संहिता भारतीय न्यायव्यवस्थेच्या प्रवासातील महत्त्वाचा मैलाचा दगड ठरली आहे. 1 जुलै 2024 पासून हे कायदे लागू झाल्यानंतर ब्रिटिश राजवट आणि ब्रिटिश काळातील गुलामगिरीची सर्व चिन्हे समाप्त करून संपूर्ण भारतीय कायदे लागू करण्यात आले. यामुळे भारताच्या

## भारतीय नागरिक सुरक्षा संहिता

**531** कलमे आता भारतीय नागरिक सुरक्षा संहितेत आहेत; तर जुन्या फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 मध्ये 484 कलमे होती. त्यापैकी 14 कलमे रद्द केली आहेत.

**177** नवीन स्पष्टीकरणे व व्याख्या समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये 9 नवीन कलमांसह 39 नवीन उपकलमांचा समावेश केला आहे.

**44** नवी स्पष्टीकरणे आणि व्याख्यांचा समावेश केला आहे.




**35** कलमांमध्ये कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

**35** ठिकाणी दृकश्राव्य नोंदणीची तरतूद करण्यात आली आहे.

## भारतीय साक्ष्य अधिनियम

**170** तरतुदी नवीन भारतीय साक्ष अधिनियमात आहेत. जुना भारतीय साक्ष अधिनियम, 1872 मध्ये 167 तरतुदी होत्या.

**24** तरतुदींमध्ये बदल केले असून दोन नवीन कलमे आणि सहा नवीन उपकलमांचा समावेश केला आहे; तर सहा कलमे वगळली आहेत.

## भारतीयांच्या भावना दुखावणारे कायद्यातील शब्द

30 जून 2024 पर्यंत देशात लागू असलेल्या कायद्यांमध्ये स्वतंत्र भारताच्या स्वाभिमानाला धक्का देणारे अनेक शब्द होते. स्वातंत्र्यानंतर 75 वर्षे उलटूनही अशा शब्दांसकट तेच कायदे लागू होते. '**United Kingdom**'ची संसद, प्रांतीय अधिवेशन, '**Crown**'चे प्रतिनिधी, '**London Gazette**', '**Jury**', '**United Kingdom of Great Britain and Ireland**', '**Her Majesty**' सरकार, '**London Gazette**'द्वारे निर्धारित प्रक्रिया, '**British Crown**'चा अपमान, '**England**'च्या न्यायालयाची परंपरा,

'**Her Majesty Romanian**', '**barrister**' असे शब्द कायद्यांमध्ये होते.



फौजदारी न्याय व्यवस्थेत एका नव्या युगाची सुरुवात झाली. हा कायदा पूर्णपणे अंमलात आल्यानंतर 'तारीख पे तारीख' अशी वर्षानुवर्षे चालणारी न्याय प्रक्रिया संपुष्टात येईल. आता कोणत्याही पीडित व्यक्तीला तीन वर्षांच्या आत न्याय मिळावा, अशा न्याय व्यवस्थेची देशात स्थापना झाली आहे.

गेल्या दोन वर्षांत भारतातील नव्या कायद्यांनी न्याय व्यवस्थेचे संपूर्ण चित्र बदलून टाकले आहे आणि त्याचा थेट परिणाम आता देशातील प्रत्येक नागरिकाला जाणवू लागला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेल्या 'भारतीय न्याय संहिते'ने न्याय देण्याबाबत एक नवी सुरुवात केली आहे. बदलत्या भारताच्या विचारसरणीचे हे प्रतिबिंब आहे.

1 जुलै 2026 पासून 'विकसित भारत – जी राम जी' लागू

# ग्रामीण भारतात आता
# 125 दिवसांच्या रोजगाराची हमी

*कोणत्याही विकसनशील देशात किंबहुना असे म्हणू की ग्रामीण भारतात उपजीविकेसाठी किमान 125 दिवसांचा रोजगार मिळणे आवश्यक आहे. ही दूरदृष्टी बाळगून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोविड-19च्या संकट काळात 125 दिवसांचे गरीब कल्याण रोजगार हमी अभियान राबविले होते. त्याच दूरदृष्टीच्या आधारे तयार करण्यात आलेला 'विकसित भारत – जी राम जी' कायदा 1 जुलैपासून लागू केला आहे. या कायद्याने 'मनरेगा'ची जागा घेतली आहे. जी राम जी कायद्यानुसार, प्रत्येक ग्रामीण कुटुंबातील प्रौढ सदस्यांनी विना कौशल्य, शारीरिक श्रमावर आधारित रोजगाराची मागणी केल्यास त्यांना मिळणार आहे प्रत्येक आर्थिक वर्षात 125 दिवसांच्या मजुरीवर आधारित रोजगाराची हमी...*

भारतासारख्या विकसनशील देशात ग्रामीण भारताचा विकास झाल्याशिवाय विकसित भारताचे स्वप्न साकार होऊ शकत नाही. याच कारणामुळे संवेदनशील आणि लोकनियुक्त पंतप्रधान म्हणून सर्वाधिक काळ शासन करण्याचा विक्रम प्रस्थापित करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी गेल्या 12 वर्षांपासून ग्रामीण भारताच्या विकासासाठी सातत्याने विविध योजना प्रत्यक्षात आणत आहेत. मार्च 2020 मध्ये कोविड-19 रोगाच्या जागतिक महासाथीदरम्यान टाळेबंदी जाहीर झाली, त्यानंतर 1.75 लाख कोटी रुपयांचे विशेष गरीब कल्याण पॅकेज जाहीर केले. त्यानंतर गावांमध्ये परतलेल्या स्थलांतरित कामगारांना रोजगार व उपजीविकेच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी गरीब कल्याण रोजगार अभियानाची सुरुवात केली आणि 50 हजार कोटी रुपयांच्या योजना लागू केल्या. गरीबांना दर्जेदार जीवनशैली उपलब्ध करून देण्याच्या त्यांच्या विचारसरणीला अनुसरून आता 'विकसित भारत – रोजगार हमी आणि उपजीविका मिशन (ग्रामीण)' लागू करण्यात आली आहे. या अंतर्गत मागणी करणाऱ्याला 125 दिवसांच्या रोजगाराची हमी दिली जाणार आहे. हा नवीन कायदा ग्रामीण भारताला आत्मनिर्भर बनविण्याचा एक आराखडा असून, तो 1 जुलैपासून लागू झाला आहे.

विकसित भारत – रोजगार हमी आणि उपजीविका मिशन (ग्रामीण) म्हणजेच वीबी - जी राम जी कायदा भारतातील ग्रामीण



# 'विकसित भारत जी राम जी'ची प्रमुख वैशिष्ट्ये...

- प्रत्येक आर्थिक वर्षात ग्रामीण कुटुंबासाठी मजुरी देणाऱ्या रोजगाराची हमी 'मनरेगा'मध्ये 100 दिवसांची होती, ती नव्या कायद्यात वाढवून 125 दिवस केली आहे.
- या कायद्यांतर्गत मनरेगामध्ये व्यापक संविधानात्मक बदल करून मग त्या कायद्याऐवजी हा कायदा लागू केला आहे. त्यामुळे उत्तरदायित्व, पायाभूत सुविधांचे परिणाम आणि उत्पन्नाविषयी सुरक्षा अधिक बळकट होणार आहे.
- या कायद्याअंतर्गत केलेल्या सर्व कामांवर ग्रामसभेची देखरेख राहील. यासाठी ग्रामपंचायत सर्व आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देईल.
- निर्धारित कालमर्यादेत रोजगार उपलब्ध करून दिला जाईल. तसे न झाल्यास संबंधित कामगारांना बेरोजगारी भत्ता मिळण्याचा अधिकार राहील.
- मजुरीचे देयक साप्ताहिक किंवा मस्टर रोल बंद झाल्यानंतर 15 दिवसांच्या आत थेट लाभ हस्तांतरणाद्वारे कामगारांच्या बँक खात्यात जमा केले जाईल.
- वेळेवर मजुरी मिळाली नाही तर; कायद्यातील तरतुदींनुसार कामगारांना विलंबाबद्दल नुकसान भरपाई मिळण्याचा अधिकार असेल.
- विकसित भारत–जी राम जी अंतर्गत नवीन ग्रामीण रोजगार हमी कार्ड जारी होईपर्यंत विद्यमान ई-केवायसी पडताळणी केलेले मनरेगा जॉब कार्ड वैध ठरेल.
- केवळ ई-केवायसी प्रलंबित असल्याच्या कारणाने कोणत्याही कामगाराला रोजगारापासून वंचित ठेवले जाणार नाही.
- चालू आर्थिक वर्षात नवीन कायद्याअंतर्गत रोजगारासाठी 1,51,282 कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च केला जाणार आहे. त्यापैकी 2026–27 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात केंद्राचा हिस्सा म्हणून 95,692 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. ग्रामीण रोजगारासाठी आजवरची ही सर्वात मोठी अर्थसंकल्पीय तरतूद आहे.
- जलसुरक्षा आणि जलसंधारणाशी संबंधित कामे करण्यात येतील. यामध्ये सिंचन, जलाशयांचे पुनरुज्जीवन, वृक्षारोपण, कालवे, पूर नियंत्रणासाठी जलमार्ग, भूमिगत बंधारे, तलाव, विहिरींचे बांधकाम आणि सामुदायिक जलसाठे क्षेत्रांचा विकास यांचा समावेश असेल.
- ग्रामीण भागात मुख्य पायाभूत सुविधा विकसित करण्याशी संबंधित कामे असतील. त्यामध्ये शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, स्वच्छता, नवीकरणीय ऊर्जा आणि सामुदायिक सुविधांशी संबंधित पायाभूत सुविधांचा समावेश असेल.
- उपजीविकेशी संबंधित पायाभूत सुविधा उभारल्या जातील. यामध्ये शेती, पशुपालन, मत्स्यपालन, कौशल्य विकास, उद्यम विकासाशी संबंधित कामांचा समावेश असेल, ग्रामीण बाजारपेठा, आठवडा बाजार, अन्न व कृषी साठवण, रोपवाटिका विकास आणि बांधकाम साहित्य उत्पादन यांसारख्या कामांचा समावेश असेल
- देखभालीसाठी बायोमेट्रिक प्रमाणिकरण, जिओ-रेफरन्सिंग, उपग्रह चित्रण आणि कामांचे डिजिटल मॅपिंग केले जाईल. तसेच डॅशबोर्ड आधारित देखरेख प्रणाली असलेले मोबाईल ॲप उपलब्ध असेल, त्यामध्ये मागणी, मंजूर कामे, कामावर नियुक्त कामगार आणि कामाची प्रगती यांचा रिअल-टाइम आढावा घेता येईल.



रोजगार धोरणात एक निर्णायक बदल घडवून आणण्यासाठी आधारभूत ठरेल. आधुनिक, उत्तरदायित्वाची जाणीव बाळगणाऱ्या आणि पायाभूत सुविधा-केंद्रित चौकटीद्वारे मनरेगा योजनेतील उणिवा या कायद्यात दूर करण्यात आल्या आहेत. वीबी - जी राम जी ग्रामीण भारतात हमी असलेल्या रोजगाराची व्याप्ती वाढवेल आणि राष्ट्रीय विकासाचे प्राधान्यक्रम आणि विविध कामांमध्ये सुसंगतता निर्माण करेल. यामध्ये मजबूत डिजिटल प्रशासन व्यवस्थेला जोडून घेतले आहे. यामुळे ग्रामीण भागात रोजगार निर्मिती, ग्रामीण विकास आणि गावांच्या आत्मनिर्भरतेला नवा वेग येईल. ग्रामपंचायतींना ग्रामीण परिवर्तनाचा केंद्रबिंदू मानून हा कायदा सक्षम, समृद्ध आणि विकसित ग्रामीण भारताच्या निर्मितीत महत्त्वाचा मैलाचा दगड ठरेल. ही नवी ग्रामीण रोजगार हमी योजना विकसित भारत 2047 च्या ध्येयाच्या पूर्ततेसाठी महत्त्वाची भूमिका बजावेल आणि विकसित ग्रामीण भारताचे स्वप्न साकार करण्यास हातभार लावेल. ■



# कुशल भारताच्या दिशेने भक्कमपणे टाकलेले पाऊल

*प्रत्येक देशाकडे वेगवेगळे सामर्थ्य असते, परंतु ते उपयोगात आणण्यासाठी युवा शक्तीची गरज असते. युवाशक्ती जितकी अधिक सक्षम असेल, तितकाच देशाचा अधिक विकास होतो. याच अनुषंगाने स्किल इंडिया मिशन एक मजबूत स्तंभ बनला आहे ज्याने मूलभूत स्तरावर युवकांना मोठी ताकद दिली आहे. 15 जुलै 2015 रोजी सुरू झालेले हे अभियान एक असा परिवर्तनात्मक उपक्रम बनला आहे ज्याने मागील 11 वर्षांमध्ये देशभरातील लाखो लोकांना कुशल आणि सक्षम बनवले आहे.*

त्रिपुराच्या दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासी महिला नित्या देवी निहोतीया यांनी स्किल इंडिया मिशनच्या माध्यमातून रबर बागायती कामाचे प्रशिक्षण घेतले आणि एक नर्सरी सुरू केली. या नर्सरीच्या माध्यमातून आता निहोतीया यांना मासिक 4,000 रुपयांचा नफा होत आहे. या योजनेच्या लाभार्थी निहोतीया सांगतात की योग्य वेळी योग्य माहिती मिळाली तर अनेक समस्यांचे निराकरण होते. अशीच गोष्ट आहे पूनम आणि कोमल या दोन बहिणींची. त्यांचीही आर्थिक स्थिती इतकी हलाखीची होती की त्या आपले शिक्षण पूर्ण करू शकत नव्हत्या. त्या परिस्थितीत स्किल इंडिया योजना त्यांच्यासाठी आशेचा एक किरण बनून आली. या दोन्ही बहिणींनी कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केले. आता दोघीही जणी कापड कंपनीत काम करत आहेत. आता त्या केवळ त्यांच्या कुटुंबालाच मदत करत नाहीत तर अशा अनेक महिलांसाठी आदर्श बनल्या आहेत ज्या आपल्या कौशल्याच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होऊ इच्छितात. आज नित्या देवी, पूनम आणि कोमल यांचा अशा लोकांमध्ये समावेश झाला आहे, ज्यांनी स्किल इंडियाच्या अनेक योजना आणि कार्यक्रमांअंतर्गत आपले प्रशिक्षण पूर्ण केले आहे आणि जे आपल्या स्वप्नांना नवी भरारी देत आहेत.



नित्या देवी निहोतिया



पूनम और कोमल

15 जुलै 2015 रोजी कौशल्य विकास आणि उद्यमशीलता मंत्रालयाने कौशल भारत अभियानाचा प्रारंभ केला. या अभियानांतर्गत भारतीय युवकांना त्यांचे व्यावसायिक कौशल्य अधिक उत्तम पद्धतीने विकसित करता यावे यासाठी एक सर्वोत्तम व्यासपीठ उपलब्ध झाले. या अभियानाचा उद्देश देशभरात व्यावसायिक प्रशिक्षण देणे, युवकांना उत्तम प्रकारे कौशल्यपूर्ण बनवणे हा आहे. भारत सरकारचे हे पाऊल मैलाचा दगड ठरले आहे आणि या योजनेने उद्योग संबंधित कौशल्य प्रशिक्षणाबरोबरच लाखो भारतीय युवकांना जोडण्यात आणि त्यांना

## खालील योजनांचा समावेश

- प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (पीएमकेव्हीवाय )
- जन शिक्षण संस्था (जेएसएस )
- राष्ट्रीय प्रशिक्षणार्थी प्रोत्साहन योजना (एनएपीएस )
- औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये शिल्पकार प्रशिक्षण योजना (सीटीएस )

## प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना

**1.64** कोटी उमेदवारांना पीएमकेव्हीवाय अंतर्गत मार्च 2026 पर्यंत 35 हून अधिक क्षेत्रांमध्ये करण्यात आले प्रशिक्षित

- निर्मिती, दूरसंचार, आरोग्य क्षेत्र तसेच करिअर आणि शिक्षण सल्लागार पदांसाठी 3.15 लाखांहून अधिक उमेदवारांना करण्यात आले प्रशिक्षित
- सध्या पीएमकेव्हीवाय 4.0 मध्ये प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जात आहेत
- पीएमकेव्हीवाय 4.0 ने 31 मार्च 2026 पर्यंत 36 राज्ये आणि 737 जिल्ह्यांमध्ये 38 क्षेत्रांमध्ये 27.24 लाख उमेदवारांना प्रशिक्षण.

## जन शिक्षण संस्था (जेएसएस)

- सध्या 294 जन शिक्षण संस्था (जेएसएस) कार्यरत आहेत.

**36,48,69** लाभार्थ्यांना 2018 ते 31 मार्च 2026 पर्यंत करण्यात आले प्रशिक्षित .

- अभ्यासक्रम स्थानिक गरजांशी सुसंगत असून त्यात शिवणकाम, भरतकाम, हस्तकला, अन्नप्रक्रिया आणि आरोग्यविषयक सेवांचा समावेश आहे.
- 31 मार्च 2026 पर्यंत, 26,720 आदिवासी लाभार्थ्यांची नावनोंदणी करण्यात आली आहे आणि 26,519 जणांना प्रशिक्षित करण्यात आले आहे.

> *कौशल्य भारत आपल्या युवकांना कुशल आणि आत्मनिर्भर बनवण्याचा संकल्प अधिक बळकट करत आहे.*
>
> **– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



## राष्ट्रीय प्रशिक्षणार्थी प्रोत्साहन योजना (एनएपीएस )

- ऑगस्ट 2016 मध्ये सुरू करण्यात आलेली ही योजना सध्या दुसऱ्या टप्प्यात एनएपीएस 2.0 मध्ये लागू केली जात आहे.
- सरकार एनएपीएस पोर्टलच्या माध्यमातून थेट प्रशिक्षणार्थींच्या बँक खात्यात 25 % विद्यावेतन (दरमहा 1,500 रुपये ) इतके योगदान देत आहे.
- 2016 ते 31 मार्च 2026 पर्यंत ऑटोमोटिव्ह, आयटी -आयटीईएस, इलेक्ट्रॉनिक्स, किरकोळ आणि निर्मिती सारख्या क्षेत्रांमध्ये 54.41 लाखांहून अधिक प्रशिक्षणार्थी सहभागी आहेत.
- वित्त वर्ष 2025-26 मध्ये सुमारे 12.35 लाख प्रशिक्षणार्थींची नियुक्ती करण्यात आली होती. याव्यतिरिक्त, सुमारे 6.42 लाख प्रशिक्षणार्थींनी वित्त वर्ष 2025-26 मध्ये आपले ऑन -द जॉब प्रशिक्षण पूर्ण केले.

## शिल्पकार प्रशिक्षण योजना (सीटीएस)

- सीटीएस अंतर्गत, देशभरातील 14,688 आयटीआय (सरकारी - 3345 आणि खाजगी - 11,343) च्या माध्यमातून 169 अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते.
- मार्च 2026 पर्यंत, एकूण 14 सीटीएस अभ्यासक्रम विकसित करण्यात आले आहेत आणि तीन वर्षांच्या कालावधीत 22 विद्यमान अभ्यासक्रमांमध्ये सुधारणा करण्यात आली आहे.
- आयटीआयमधील प्रवेशांची संख्या 2022-23 या आर्थिक वर्षातील 12.51 लाखांवरून वाढून 2025-26 या आर्थिक वर्षात 14.70 लाख झाली आहे.

सक्षम बनवण्यात मदत केली. त्याचबरोबर त्यांच्यासाठी या प्रशिक्षणाने उपजीविकेच्या उत्तम संधी खुल्या केल्या.

या योजनेअंतर्गत असलेल्या व्यावसायिक प्रशिक्षण अभ्यासक्रमाने महिलांसाठीही अद्भुत काम केले आहे. या योजनेअंतर्गत महिलांना रोजगारक्षम बनण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले. या एका छोट्याशा प्रशिक्षणाने या महिलांचे आयुष्य पूर्णपणे बदलून टाकले आहे; आता या सामान्य महिला स्वतः हिरो बनल्या आहेत असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

डिजिटल इंडिया कार्यक्रमाची 11 वर्षे

# तंत्रज्ञानातून परिवर्तनाचे नवे युग



*आज तंत्रज्ञान हा प्रत्येक नागरिकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. सामाजिक सक्षमीकरण, शिक्षण, कौशल्य विकास, कृषी, आरोग्य किंवा परिवहन व लॉजिस्टिक्स – यांसारख्या प्रत्येक स्तरावर गेल्या एका दशकात देशात डिजिटलीकरण वाढले आहे. या सगळ्यामागे, तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण तसेच नागरिकांना सक्षम बनवण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा दृष्टिकोन आहे. याच विचारासह 1 जुलै 2015 रोजी सुरू करण्यात आलेल्या डिजिटल इंडिया कार्यक्रमामुळे नागरिकांच्या जीवनात सुलभता वाढली आहे तसेच डिजिटल अर्थव्यवस्थेचाही वेगाने विस्तार होत आहे. डिजिटल इंडिया कार्यक्रमाच्या 11 व्या वर्षपूर्तीनिमित्ताने या अंतर्गत झालेल्या प्रगतीवर चर्चा करूया.*

भारतात डिजिटल समावेशकता ही केवळ उपकरणे आणि डेटापुरती मर्यादित नाही; तर ती क्षमतांचा विकास करणे, संधी निर्माण करणे आणि प्रत्येक गाव व शहरापर्यंत विकास पोहोचवणे यासाठीचा एक सेतू बनली आहे. 'डिजिटल इंडिया' कार्यक्रम सुरू झाल्यापासून, देशभरात कनेक्टिव्हिटीला कौशल्य विकास, विविध प्लॅटफॉर्म्स आणि स्टार्टअप्सशी जोडून भारतात एक सर्वसमावेशक डिजिटल परिसंस्था तयार करण्यात आली आहे. 'डिजिटल इंडिया'ने डिजिटल शासनाला बळकटी दिली आहे; यामुळे केवळ जीवनच सुलभ झाले नाही, तर व्यवसाय करणेही सोपे झाले आहे. भारताला डिजिटलदृष्ट्या सक्षम आणि ज्ञान-आधारित अर्थव्यवस्थेत रूपांतरित करण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'डिजिटल इंडिया' कार्यक्रमाची सुरुवात केली होती . 'डिजिटल इंडिया' कार्यक्रमाने अनेक टप्पे पार करत महत्त्वपूर्ण यश संपादन केले असून अर्थव्यवस्थेच्या डिजिटलायझेशनच्या बाबतीत भारत आता जागतिक स्तरावर तिसऱ्या क्रमांकावर आहे. याचे एक प्रमुख कारण म्हणजे भारताची भक्कम डिजिटल पायाभूत व्यवस्था.

केवळ देशानेच नव्हे, तर जगानेही 'जनधन -आधार -मोबाइल'ची त्रिशक्ती पाहिली आहे. बँकिंग व्यवस्थेला एका नव्या उंचीवर पोहचवले आहे तसेच डिजिटल इंडियाच्या या सामर्थ्याने 4 लाख कोटी रुपयांहून अधिक रकमेची सरकारी तिजोरीतून होणारी गळती रोखण्याचे काम केले आहे. अशाच प्रकारे भारताच्या 'युनिफाइड पेमेंट इंटरफेस' म्हणजेच युपीआयची जगाच्या रिअल टाईम पेमेंटमध्ये 49% भागीदारी झाली आहे. नऊ देशांनी ही भारतीय प्रणाली स्वीकारली आहे. 'कॉमन सर्व्हिस सेंटर्स' असोत किंवा डिजिटल सेवांची वाढती मागणी, यांमुळे रोजगार आणि गुंतवणुकीच्या नव्या संधीही निर्माण झाल्या आहेत. भारताची डिजिटल अर्थव्यवस्था सातत्याने विस्तारत आहे. असा अंदाज आहे की, 2029-30 पर्यंत भारताची डिजिटल अर्थव्यवस्था राष्ट्रीय उत्पन्नात एक-पंचमांश इतके योगदान देईल.

> “
> *भारताची 'डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा' आज संपूर्ण जगभरात चर्चेचा विषय बनली असून आदर्श मानली जात आहे. आपण आता डिजिटल पायाभूत सुविधांच्या पुढील टप्प्याच्या दिशेने वाटचाल करत आहोत. 'यूपीआय'ने डिजिटल पेमेंटला नव्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. आज भारत हा जगातील सर्वात वेगाने 'रिअल-टाइम' डिजिटल पेमेंट करणारा देश बनला आहे.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

# अशा प्रकारे जीवन सुलभ बनवत आहे डिजिटल इंडिया

## सामाजिक सक्षमीकरण

**11+ कोटींहून** अधिक उमंग ॲपवर नोंदणी झाली आहे. याद्वारे नागरिक सुमारे 2400 प्रकारच्या सरकारी सेवांचा लाभ घेऊ शकतात.




- 6+ कोटी वापरकर्ते आहेत **MyGov** संकेतस्थळावर
- 2+ कोटी युवक आणि संघटना **MyBharat** पोर्टलशी जोडलेल्या आहेत, 783 जिल्ह्यांमध्ये मायभारत केंद्रे स्थापित केली जातील.
- 7.22 लाख किमी ऑप्टिकल फायबर टाकण्यात आली आहे. भारतनेट योजनेत देशभरात इंटरनेट कनेक्टिव्हीटी मजबूत झाली आहे.
- 2+ लाख ग्राम पंचायतींना भारतनेट कार्यक्रमांतर्गत ऑप्टिकल फायबरशी जोडण्यात आले आहे.

## डिजिटल पायाभूत सुविधा

**70+ कोटी**

डिजिलॉकर वापरकर्ते आहेत ज्यामध्ये 950 कोटी डिजिटल दस्तावेज आहेत.




- 74.4 कोटींहून अधिक प्रयोगकर्ते मेरी पहचान संकेतस्थळावर आहेत. त्याच्याशी 16 हजारांहून अधिक सेवा जोडलेल्या आहेत. सिंगल साईन इन द्वारे अनेक सरकारी सेवा येथे मिळवता येऊ शकतात.
- 5+ लाख 'कॉमन सर्व्हिस सेंटर्स' देशभरात कार्यरत असून, त्याद्वारे सहाय्यक डिजिटल स्वरूपात 800 हून अधिक सेवा उपलब्ध आहेत.
- 90% टक्क्यांहून अधिक फाइल्स 'ई-ऑफिस' मध्ये आल्या आहेत. त्यामुळे सरकारी विभागांमध्ये कागदविरहित कामकाज शक्य झाले आहे.

## वित्तीय समावेशकता म्हणजेच फायनान्शिअल इन्क्लुजन




**188+ कोटी**

ई -वे बिल 2025-26 मध्ये जारी करण्यात आले. वाहतुकीसाठी अनेक राज्यस्तरीय परमिटच्या जागी एकच एकीकृत इलेक्ट्रॉनिक दस्तावेज आहे.

- 10+ कोटींहून अधिक वेळा डिजीयात्राचा वापर देशातील 38 विमानतळांवर करण्यात आला आहे.
- 51+ लाख कोटी रुपये जनधन -आधार-मोबाईलच्या त्रिशक्तीद्वारे डीबीटी म्हणजेच थेट लाभ हस्तांतरण करण्यात आले .
- 58+ कोटी जनधन खाती तयार झाली.
- 144+ कोटींहून अधिक आधार क्रमांक जारी. ही जगातील सर्वात मोठी डिजिटल ओळख प्रणाली आहे. 2014 मध्ये 61 कोटी आधार क्रमांक होते.
- 9 देशांनी भारताची 'यूपीआय' प्रणाली स्वीकारली आहे.
- सिंगापूर, संयुक्त अरब अमिराती, फ्रान्स, मॉरिशस, नेपाळ, भूतान, कतार आणि श्रीलंकासह आता कंबोडियामध्येही भारतीय यूपीआय स्वीकारले जात आहे.
- 49% इतका युपीआयच्या माध्यमातून जागतिक रिअल टाइम पेमेंटमधील भारताचा हिस्सा आहे.
- 81% अधिक युपीआयचा वाटा भारतातील सर्व किरकोळ डिजिटल व्यवहारांमध्ये आहे.
- 64+ कोटी लोक आणि व्यापारी युपीआय प्लॅटफॉर्मचा वापर करत आहेत.

## वाहतूक आणि लॉजिस्टिक्स

**16+ लाख कोटी रुपये**

अंदाजे खर्चाच्या 352 प्रकल्पांचे पीएम गति शक्ती प्लॅटफॉर्मवर मूल्यांकन करण्यात आले आहे.

- 12+ कोटी फास्टॅग जारी. टोल नाक्यांवर आता वाहने केवळ काही सेकंदच थांबतात; यामुळे इंधनाचा खर्च कमी झाला. पर्यावरणालाही फायदा झाला.
- 'युनिफाइड लॉजिस्टिक्स इंटरफेस प्लॅटफॉर्म' (युलिप ) हा एक डिजिटल मंच आहे. तो लॉजिस्टिक्सशी संबंधित विविध मंत्रालये आणि विभागांचा डेटा एकाच मंचावर आणतो.



## आरोग्य सेवा आणि कल्याण

- 90+ कोटी आभा खात्यांचा विक्रम आयुष्मान भारत डिजिटल मिशनने केला आहे. हा 14 अंकी आरोग्य ओळख क्रमांक आहे.
- 45+ कोटी ई-कन्सल्टेशन्स 'ई-संजीवनी' मार्फत झाले.
- 8.9 कोटी लाभार्थी आणि 14 लाखांहून अधिक अंगणवाड्या पोषण ट्रॅकर'शी जोडण्यात आल्या.
- 'आरोग्य सेतू' ॲपने कोविड -19 दरम्यान लसीकरण आणि संसर्ग शोधण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावली.



## शेतकरी आणि ग्रामीण

**4.27+** लाख कोटी रुपयांहून अधिक

रक्कम पीएम -किसान योजनेअंतर्गत देण्यात आली आहे. ही शेतकरी केंद्रित डिजिटल पायाभूत सुविधा आहे, ज्यामध्ये ओटीपी आधार आधारित ई-केवायसी , बायोमेट्रिक प्रमाणीकरणाचाही समावेश आहे.

- एम4एग्री द्वारे ईशान्येकडील राज्यांमधील शेतकऱ्यांना कृषी आणि फलोत्पादनाबाबत दिला जातो.
- 97+ टक्के इतके देशभरातील जमिनीच्या नोंदींचे डिजिटलायझेशन पूर्ण झाले आहे. 19 राज्यांमधील नागरिक आता घरी बसून डिजिटल स्वाक्षरी असलेल्या आणि कायदेशीरदृष्ट्या वैध अशा जमिनीच्या नोंदी डाउनलोड करू शकतात.
- 36+ कोटी भूखंडाना विशिष्ट भूखंड ओळख क्रमांक देण्यात आला आहे. हा एक १४-अंकी अल्फान्यूमेरिक कोड आहे. त्यामुळे बनावट व्यवहारांना आळा बसतो.

**9+** कोटी

शेतकरी ओळखपत्रे तयार करण्यात आली.





## शिक्षण आणि कौशल्य

**1.5** कोटी वापरकर्ते iGOT कर्मयोगी प्लॅटफॉर्मशी जोडलेले आहेत. 4000+ डिजिटल अभ्यासक्रम आहेत.

**566+** कोटी लर्निंग सेशन दीक्षा प्लॅटफॉर्मवर झाली. 2 कोटींहून अधिक वापरकर्ते आहेत.

- 800+ सरकारी वेबसाईट्सशी जोडलेले आहे डिजिटल इंडिया भाषिणी. दररोज 1.5 कोटींहून अधिक एआयशी निगडित काम पूर्ण करते.
- 16 लाखांहून अधिक उमेदवारांना फ्युचर स्किल्स प्राईम कार्यक्रमामुळे फायदा झाला. यातील 85 टक्के लाभार्थी द्वितीय आणि तृतीय श्रेणीतील शहरांमधील आहेत.
- 6.39 कोटी ग्रामस्थांना प्रधानमंत्री ग्रामीण डिजिटल साक्षरता अभियान' (पीएमजीदिशा ) अंतर्गत प्रशिक्षित करण्यात आले. लक्ष्य 6 कोटी कुटुंबांमधील प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीच्या प्रशिक्षणाचे होते.
- ई-काउन्सेलिंग, ई-ग्रंथालय, नॅशनल अकॅडेमिक डिपॉझिटरी देखील मार्ग सुलभ करत आहेत.

## उद्यमशीलता आणि निर्मिती

- 2.2+ लाख स्टार्टअप्ससह, भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची सर्वात मोठी स्टार्टअप परिसंस्था बनला आहे. तंत्रज्ञान लोकांचे जीवन सुलभ बनवत आहे.
- स्टार्टअप इंडिया हब हा एक डिजिटल मंच आहे. तिथे उदयोन्मुख उद्योजक, गुंतवणूकदार, मार्गदर्शक, इनक्युबेटर्स आणि सरकारी संस्था एकाच मंचावर येतात. नवोन्मेष आणि व्यापाराला चालना मिळते.

## उदयोन्मुख तंत्रज्ञान

'नॅशनल प्रोग्रॅम ऑन आर्टिफिशियल इंटेलिजन्स', 'इंडिया-एआय' आणि 'सेंटर ऑफ एक्सलन्स फॉर इंटरनेट ऑफ थिंग्ज' यांसारखे डिजिटल प्लॅटफॉर्म्स देशभरात उदयोन्मुख तंत्रज्ञानाला चालना देण्यात उपयुक्त ठरत आहेत.



## खरेदी, व्यापार आणि कर

- आईसगेट (ICEGATE) भारतीय केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमाशुल्क मंडळाचे पोर्टल आहे. त्याला युलिप, मोटर व्हेइकल परिसंस्था आणि बीएसएफएक रिअल टाईम डेटा शेअरिंग नेटवर्क बनवले आहे. त्यामुळे सीमेवर क्लिअरन्स आणि कार्गो प्रोसेसिंग वेगवान झाले आहे.

**18+** लाख कोटी रुपये

इतकी सरकारी खरेदी जीईएम प्लॅटफॉर्मवर प्रारंभापासून एप्रिल 2026 पर्यंत झाली.



पीएम विकसित भारत रोजगार योजना

# नवीन भारताच्या कार्यबळाचे सक्षमीकरण




*श्रम बाजारपेठ मजबूत करण्याच्या उद्देशाने, केंद्र सरकार 'प्रधानमंत्री विकास भारत रोजगार' योजनेच्या माध्यमातून देशात रोजगार निर्मितीमध्ये एक नवीन अध्याय सुरू करत आहे. देशात प्रथमच औपचारिक रोजगारासाठी थेट आर्थिक मदत दिली जात आहे. दोन वर्षांत 3.5 कोटीपेक्षा जास्त रोजगार निर्माण करण्याच्या उद्दिष्टाच्या दिशेने वाटचाल करत असताना, या योजनेअंतर्गत फेब्रुवारी 2026 पर्यंत अंदाजे 56 लाख कामगारांची नोंदणी झाली आहे...*

पंतप्रधान नरेंद्र मोदी रोजगाराकडे 'कल्याणकारी योजनांचे वाटप' म्हणून नव्हे, तर सक्षमीकरणाचे साधन म्हणून पाहतात. हीच दूरदृष्टी 'विकसित भारत 2047' चे स्वप्न साकार करण्यासाठी मुख्य प्रेरक शक्ती ठरेल; म्हणूनच फेब्रुवारी 2026 पर्यंत पंतप्रधान विकासित भारत रोजगार योजनेअंतर्गत एकूण 55.9 लाख प्रथमच काम करणारे कर्मचारी आणि 1.14 कोटी पुनर्नियुक्त कर्मचाऱ्यांची नोंदणी करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत, प्रथमच नोकरीला लागलेल्या आणि नवीन युनिव्हर्सल अकाउंट नंबर मिळालेले कर्मचारी कमाल 15,000 रुपयांच्या प्रोत्साहनपर रकमेसाठी पात्र असतील. हा निधी सहा सहा महिन्यांच्या अंतराने दोन हप्त्यांमध्ये दिला जाईल. तसेच दुसरीकडे, सरकार प्रत्येक नवीन कर्मचाऱ्याला सहा महिन्यांचा स्थिर रोजगार दिल्यानंतर नियोक्त्यांना 3,000 रुपयांपर्यंतचे प्रोत्साहनही देणार आहे.

केंद्रीय मंत्रिमंडळाने 1 जुलै 2025 रोजी रोजगाराशी संबंधित प्रोत्साहनपर योजनेला मंजुरी दिली, या योजनेसाठी 99,446 कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेचे उद्दिष्ट 2 वर्षांच्या कालावधीत देशात 3.5 कोटींहून अधिक नोकऱ्या निर्माण करण्यास प्रोत्साहन देणे असे आहे. या योजनेचे फायदे 1 ऑगस्ट 2025 ते 31 जुलै 2027 दरम्यान निर्माण झालेल्या नोकऱ्यांना लागू होतील. 1 लाख रुपयांपर्यंत पगार असलेले कर्मचारीच या योजनेसाठी पात्र असतील. नवीन नोकऱ्यांच्या निर्मितीमुळे युवकांचे भविष्य सुरक्षित होण्याबरोबच आत्मनिर्भर भारताचा पाया देखील अधिक मजबूत होईल. केंद्र सरकारने 2024-25 च्या केंद्रीय अर्थसंकल्पात योजना जाहीर करण्यात आली होती, 'पंतप्रधानांच्या रोजगार आणि कौशल्य विकास पॅकेज' अंतर्गत रोजगार संलग्न प्रोत्साहन योजनेची घोषणा केली होती. या योजनेचे दोन घटक आहेतः ही योजना कर्मचाऱ्यांना आधार देते आणि आस्थापनांना नवीन कर्मचाऱ्यांची उत्पादकता वाढवण्यात मदत करते. ▪

> *आज प्रत्येक भारतीय एक मोठा संकल्प करुन पुढे वाटचाल करत आहे. हा संकल्प आहे 2047 पर्यंत विकसित भारताच्या निर्मितीचा. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी आज देश वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करत आहे आणि या गुंतवणुकीमुळे देशातील युवकांना रोजगारासाठी नवनवीन संधी निर्माण होत आहेत.*
>
> **–नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

सुरत आणि दमणमध्ये अंदाजे 23,000 कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी

# आधुनिक संपर्कव्यवस्था आणि विकासाचा नवीन अध्याय

*केंद्र सरकार सुरत, गुजरात आणि दमण या केंद्रशासित प्रदेशात प्रादेशिक विकासाचे नवे पर्व आणि मजबूत संपर्कव्यवस्था आणण्यासाठी सातत्याने वचनबद्ध आहे. याच प्रयत्नांचा भाग म्हणून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 5 जून रोजी सुरत, दमण आणि लक्षद्वीप येथे सुमारे 23,000 कोटी रुपयांच्या अनेक रस्ते, विमानतळ, रुग्णालय, ऊर्जा आणि औद्योगिक विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. हे प्रकल्प केवळ जीवनमान सुलभ करणार नाहीत, तर देशाला आत्मनिर्भर बनवण्याच्या संकल्पालाही गती देतील...*

देश विकसित भारताच्या ज्या संकल्पासह पुढे वाटचाल करत आहे, त्याच दिशेने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली प्रत्येक दिवशी एक नवीन अध्याय जोडला जात आहे. कोणतेही राज्य असो किंवा केंद्रशासित प्रदेश, विकासाच्या बाबतीत कोणत्याही स्तरावर मागे राहू नये यासाठी स्वतः पंतप्रधान नरेंद्र मोदी सदैव देखरेख ठेवत असतात. या संदर्भात, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 5 जून रोजी गुजरात राज्यातील सुरत, केंद्रशासित प्रदेश दमण आणि लक्षद्वीपला भेट दिली. या दौऱ्यात त्यांनी सर्वसामान्य लोकांच्या सोयीसाठी अनेक प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. एकीकडे, प्रकल्पांच्या उद्घाटनामुळे सर्वसामान्य लोकांचे जीवन सुखकर होईल, तर

> “
> *हे दशक जगासाठी आपत्तीचे दशक ठरत आहे. आधी कोरोना विषाणूचे मोठे संकट आले, मग ठिकठिकाणी युद्धे भडकली... आता हे मोठे ऊर्जा संकट... याने संपूर्ण जगाला गोंधळात टाकले आहे. पण मला याचे मनापासून समाधान आहे की, 140 कोटी भारतीयांच्या सामूहिक प्रयत्नांतून देश अशा प्रत्येक संकटाचा दृढनिश्चयाने सामना करत आहे.*
>
> **- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## सुरतकडून देशाला विकास प्रकल्पांची देणगी

- उद्घाटनः 8-पदरी, प्रवेश-नियंत्रित वडोदरा-मुंबई द्रुतगती मार्गाचा मोठा भाग राष्ट्राला समर्पित करण्यात आला
- सूरतमध्ये 220 खाटांच्या ईएसआयसी रुग्णालयाचे उद्घाटन
- वीज पारेषण जाळ्याच्या विस्ताराचा प्रकल्प
- रसायने आणि पेट्रोकेमिकल्स गुंतवणूक क्षेत्र
- सरीगाम गुजरात औद्योगिक विकास महामंडळ (GIDC) येथील प्रगत सांडपाणी विल्हेवाट
- पायाभरणीः आदिवासी भागांमधील दळणवळण सुधारण्यासाठी आणि 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'पर्यंतचा प्रवास अधिक सुलभ करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग -56 वरील महत्त्वपूर्ण टप्प्यांच्या चौपदरीकरण प्रकल्पाची पायाभरणी




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुजरातच्या हाजिरा येथील लार्सन अँड टुब्रोच्या कॅम्पसला भेट दिली, तसेच विविध क्षेत्रांमध्ये कंपनी विकसित करत असलेल्या नवनवीन शोधांचे अवलोकन केले.

दुसरीकडे, ज्या प्रकल्पांची पायाभरणी झाली आहे ते येणाऱ्या काळात भविष्य अधिक सुलभ करतील. सुरतमध्ये 18,800 कोटी रुपये, दमणमध्ये 2,970 कोटी रुपये आणि लक्षद्वीपमध्ये 885 कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली.

सुरत येथे आयोजित एका कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताच्या ऊर्जा आत्मनिर्भरतेमध्ये गुजरातच्या योगदानाची प्रशंसा केली. देशाच्या 250 गिगावॅट नवीकरणीय ऊर्जा क्षमतेपैकी एक-पंचमांश क्षमतेइतक्या (50 गिगावॅट) ऊर्जेची निर्मिती या राज्यात होते, असे ते म्हणाले. राज्य ग्रीन हायड्रोजन आणि ग्रीन अमोनिया यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये नेतृत्व करण्यास सज्ज आहे, गेल्या बारा वर्षांत सौर ऊर्जा, इथेनॉल मिश्रित इंधन, रेल्वेचे विद्युतीकरण, अणुऊर्जा, अत्याधुनिक वीज पारेषण जाळे आणि गॅस पाइपलाइन आणि बंदरांवरील साठवणूक क्षमतेचा प्रचंड विस्तार झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेले जागतिक संकट ऊर्जेच्या बाबतीत आत्मनिर्भरता किती आवश्यक आहे हे दर्शवते.

हाजिरा येथे केलेल्या दौऱ्याचा उल्लेख करुन पंतप्रधानांनी या प्रदेशाचे वर्णन केवळ एक औद्योगिक क्षेत्र म्हणून नव्हे, तर ऊर्जा, पोलाद, संरक्षण उत्पादन आणि जागतिक सागरी व्यापार यांचा समावेश असलेली एक व्यापक, समृद्ध व्यवस्था म्हणून केले. त्यांनी या सागरी-औद्योगिक केंद्राला 'आत्मनिर्भर भारत' उपक्रमाचा एक जिवंत पुरावा म्हणून संबोधले आणि आत्मनिर्भरता अभियानाची खिल्ली उडवणाऱ्या आणि ऐतिहासिकदृष्ट्या देशाला परकीय घटकांवर अवलंबून ठेवणाऱ्या देशातील निराशावादी गटांचा तीव्र शब्दांत निषेध केला. आत्मनिर्भरतेला

## लक्षद्वीपच्या सामाजिक-आर्थिक विकासाला गती

- पायाभरणीः सुमारे 885 कोटी रुपये खर्चाच्या प्रकल्पांची पायाभरणी
- या प्रकल्पांमध्ये कल्पेनी बेट आणि कादमत बेट या दोन्ही बेटांच्या पूर्व आणि पश्चिम बाजूंना बंदर सुविधांचा विकास केला जाणार.
- बहुउद्देशीय जेट्टींच्या विकासामुळे 300 मीटरपर्यंत लांबी असलेल्या क्रूझ जहाजांसह मोठ्या प्रवासी जहाजांना वर्षभर नांगरण्याची सुविधा मिळेल.
- मत्स्य हाताळणी, इंधन वितरण, बर्फ पुरवठा आणि बोट दुरुस्तीसाठी एकात्मिक सुविधा उपलब्ध होणार.
- हे उपक्रम सागरी दळणवळणाला बळकटी देतील. स्थानिक मच्छिमारांच्या उपजीविकेला हातभार लावतील, पर्यटनाला चालना देतील आणि या बेटांच्या सामाजिक-आर्थिक विकासात योगदान देतील.





## दमणला मिळाली विकासाची देणगी

- **उदघाटन:** 'नमो विमानतळाच्या' नवीन टर्मिनल इमारतीसह आणि 'नमो रुग्णालयाचे उद्घाटन.
- **पायाभरणी:** आयकॉनिक ब्रिज, दमण कन्व्हेन्शन सेंटर आणि एनआयएफटी कॅम्पस.



## पहिल्या जागतिक योगासन अजिंक्यपद स्पर्धेचे उद्घाटन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 4 जून रोजी पहिल्या जागतिक योगासन अजिंक्यपद स्पर्धेचे उद्घाटन केले. यामुळे जागतिक क्रीडा क्षेत्रात एक ऐतिहासिक मैलाचा दगड प्रस्थापित झाला आहे. 'आज अहमदाबादच्या भूमीवरून जगाच्या क्रीडा वारशामध्ये एक नवीन अध्याय जोडला जात आहे,' असे पंतप्रधान यावेळी म्हणाले. अहमदाबाद हे युनेस्कोचे जागतिक वारसा शहर आहे आणि भारताच्या या ऐतिहासिक शहरात या कार्यक्रमाचे आयोजन करणे ही संपूर्ण देशासाठी अभिमानाची गोष्ट आहे. जसजसा योगासन खेळाचा विस्तार होईल, तसतशा नवीन शक्यता निर्माण होतील. यामध्ये खेळाडू, प्रशिक्षक, क्रीडा शास्त्रज्ञ, संशोधक आणि इव्हेंट मॅनेजर यांच्यासाठी करिअरच्या संधी उपलब्ध होतील, असेही त्यांनी सांगितले.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

चालना देण्यासाठी आधुनिक संचारसंपर्कावर सरकारचा भर असल्याचे त्यांनी सांगितले.

समर्पित मालवाहू मार्गिका, बुलेट ट्रेन तसेच वडोदरा-मुंबई द्रुतगती मार्ग यांसारख्या योजनाऔद्योगिक आणि व्यापारी विकासासाठी महत्त्वपूर्ण आहेत. छोटा उदेपूर, नर्मदा, भरूच आणि तापी या आदिवासी पट्ट्यांमध्ये चार पदरी महामार्ग आणून सरकार प्रवासाचा वेळ आणि मालवाहतुकीचा खर्च कमी करत आहे, आदिवासी आणि ग्रामीण भागांमध्ये आधुनिक संचारसंपर्क आणून हे सुनिश्चित केले जात आहे की त्यांना शिक्षण, वैद्यकीय सेवा आणि वाढीव कमाईच्या संधींसाठी उत्कृष्ट सुविधा मिळतील.

पंतप्रधानांनी दमणमध्ये 2,970 कोटी रुपये खर्चाच्या विकास प्रकल्पांचे उद्घाटन, लोकार्पण आणि पायाभरणी केली. येथे एका जाहीर सभेला संबोधित करताना पंतप्रधान मोदींनी त्यांच्या पूर्वीच्या दौऱ्याची आठवण करून दिली. त्यावेळी व्यक्त झालेल्या भावना आता प्रत्यक्षात उतरल्या आहेत. हा प्रदेश आता अभिमानाने देशाची विविधता आणि चैतन्य दर्शवतो. "दमण हे मिनी इंडियाचे एक जिवंत उदाहरण बनले आहे, जिथे विविध प्रदेशांतील लोक राहतात आणि संपूर्ण देशाची एक सुंदर झलक सादर करतात." असे ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासकीय प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. त्यांनी दमण, दीव आणि दादरा आणि नगर हवेली येथे राबवण्यात येत असलेल्या प्रभावी शासन मॉडेलची प्रशंसा केली. तसेच त्यांनी संपर्कसंचार, आरोग्य, शिक्षण, पर्यटन आणि शहरी पायाभूत सुविधांशी संबंधित अनेक प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी केली. त्यांनी दमणच्या विकासाची तुलना सिंगापूरच्या आर्थिक प्रगतीशी करून एक दूरदृष्टीचा दृष्टिकोन मांडला. 'नमो विमानतळ' आणि 'दमणगंगा पूल' यांसारखे मोठे प्रकल्प केवळ स्थानिक परिवर्तन नसून, ते असे मैलाचे दगड आहेत जे या प्रदेशाला जागतिक स्तरावर एक नवी ओळख देतील, असे ते म्हणाले. अशा पायाभूत सुविधांच्या माध्यमातून भविष्यातील प्रयत्नांसाठी एक भक्कम पाया घातला जात आहे.

केंद्रशासित प्रदेशात शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण बदल घडत आहेत. पूर्वी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी स्थलांतर करावे लागत असे, परंतु आता हा केंद्रशासित प्रदेश शिक्षण क्षेत्रात सातत्याने प्रगती करत आहे. सरस्वती सायकल योजना आणि सरस्वती विद्या योजना येथील मुलींसाठी उपयुक्त ठरत आहेत. खेलो इंडियासारख्या उपक्रमांमुळे खेळ केवळ महानगरांपुरते मर्यादित न राहता, गावे, शहरे आणि लहान भागांपर्यंत विस्तारले आहेत. दीव हे एक प्रमुख बीच स्पोर्ट्स पर्यटन स्थळ म्हणूनही उदयास येत आहे, ज्यामुळे क्रीडा पर्यटनाला एक नवीन ओळख मिळत आहे. ▪

# सन्मान शौर्याचा...

*आज राष्ट्र केवळ सीमांवरच नव्हे, तर देशाच्या अंतर्गत भागांतही दहशतवाद आणि सशस्त्र गटांच्या धोक्यापासून सुरक्षित आहे. यामागे आपल्या सैनिकांचे, केंद्रीय सशस्त्र पोलीस दलांचे आणि पोलिसांचे अद्वितीय शौर्य, अदम्य धैर्य आणि असामान्य नेतृत्व आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी 8 जून 2026 रोजी राष्ट्रपती भवनात आयोजित संरक्षण अलंकरण समारंभ 2026 (पहिला टप्पा) मध्ये अशा 51 शूरवीरांचा सन्मान केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील या संरक्षण अलंकरण समारंभाला (पहिला टप्पा) उपस्थित होते. पंतप्रधानांनी या शूरवीरांचे अदम्य शौर्य, समर्पण आणि राष्ट्रासाठी केलेल्या निःस्वार्थ सेवेबद्दल अभिमान व्यक्त केला...*

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संरक्षण दल, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि राज्य/केंद्रशासित प्रदेश पोलीस दलांमधील शूर जवानांना 7 कीर्ती चक्र (ज्यात 2 मरणोत्तर पुरस्कारांचा समावेश होता), 15 वीर चक्र (ज्यात 3 मरणोत्तर पुरस्कारांचा समावेश होता) आणि 29 शौर्य चक्र (ज्यात एक मरणोत्तर देण्यात आले) प्रदान केले. चला, शौर्याच्या काही कथा जाणून घेऊया...



## लान्स नाईक मीनातवी सुंदरम ए, कीर्ती चक्र

**तोफखाना रेजिमेंटचे मीनात्वी सुंदरम ए यांनी गंभीर जखमी असूनही कुलगाम मध्ये एका दहशतवाद्याला ठार केले.**



## ग्रुप कॅप्टन प्रशांत बालकृष्णन नायर, फ्लाइंग पायलट, कीर्ती चक्र

भारताची पहिली मानवी अंतराळयान मोहीम, गगनयानसाठी निवडलेल्या चार अंतराळवीरांपैकी एक असलेल्या ग्रुप कॅप्टन प्रशांत बालकृष्णन नायर यांनी राष्ट्राच्या प्रगतीत योगदान देण्याचा दृढनिश्चय दाखवला. त्यांच्या या अदम्य धैर्याबद्दल आणि शौर्याबद्दल त्यांना कीर्ती चक्र प्रदान करण्यात आले. ग्रुप कॅप्टन प्रशांत यांनी ॲक्सिअम-4 मोहिमेसाठी स्टँडबाय मिशन पायलट म्हणूनही काम पाहिले आहे. त्यांनी विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अंतराळ संस्थांमध्ये प्रशिक्षण घेतले. उत्कृष्ट शारीरिक क्षमता, मानसिक कणखरता आणि एकाग्रता यांचे प्रदर्शन केले. ॲक्सिअम-4 मोहिमेच्या तयारीदरम्यान, त्यांनी अज्ञात धोक्यांना सामोरे जाण्याची इच्छाशक्ती आणि अत्यंत जोखमीच्या परिस्थितीतही शांत राहण्याची क्षमता दाखवली.

## लेफ्टनंट शशांक तिवारी, मरणोत्तर कीर्ती चक्र

आर्मी सर्व्हिस कॉर्प्स सिक्कीम स्काऊट्सचे लेफ्टनंट शशांक तिवारी हे उत्तर सिक्कीमच्या उंच भागात एका गस्ती पथकाचे नेतृत्व करत होते. त्याचवेळी गस्ती पथकातील सदस्य अग्निवीर स्टीफन सुब्बा यांचा तोल जाऊन ते नदीत पडले. लेफ्टनंट शशांक तिवारी यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता, नदीत उडी घेतली आणि अथक प्रयत्न करून सुब्बा यांना नदीकिनाऱ्यावर सुरक्षित पोहोचवले. अग्निवीर बचावले, पण पाण्याच्या वेगवान प्रवाहामुळे त्यांना स्वतःला कोणताही आधार घेता आला नाही. आपल्या सहकाऱ्याला वाचवताना खडकांवर आदळल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली आणि त्यातच त्यांना वीरमरण आले. असामान्य शौर्य, निःस्वार्थ कर्तव्यनिष्ठा आणि अढळ धैर्य यांसाठी लेफ्टनंट शशांक तिवारी यांना मरणोत्तर कीर्ती चक्र प्रदान करून गौरवण्यात आले.



## नायब सुभेदार डोलेश्वर सुब्बा, कीर्ती चक्र

किश्तवाड जिल्ह्यातील दुर्गम आणि निर्मनुष्य वनक्षेत्रात प्रसंगावधान आणि असामान्य शौर्य दाखवत त्यांनी एकाच कारवाईत दोन दहशतवादी ठार केले.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आलेल्या शौर्य पुरस्कारांच्या समारंभाचा कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

नीती आयोगाच्या नियामक परिषदेची पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली बैठक

# जगाला प्रेरणा देत राहणारी आहे भारताची विकासगाथा

*नीती आयोग भारताचा पाया भक्कम करणारी प्रमुख संस्था आहे. विकासाच्या प्रत्येक पैलूबाबत जागतिक पातळीवर स्पर्धेसाठी देशाला सज्ज ठेवण्याबाबतचा सरकारचा दृष्टिकोन प्रत्यक्षात आणला जातो. भारत आज केवळ स्पर्धा करत नाही, तर प्रत्येक मोठ्या अर्थव्यवस्थांच्या पुढे जाण्याचा प्रयत्न तो करत आहे. त्याबरोबरच 2047 पर्यंत विकसित राष्ट्र होण्याच्या दिशेने तो आगेकूच करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 11 जून रोजी नीती आयोगाच्या 11 व्या नियामक परिषद बैठकीत सांगितले की, भारताची विकासगाथा जगाला देत आहे प्रेरणा...*

नवी दिल्लीतल्या राष्ट्रपती भवन सांस्कृतिक केंद्रामध्ये नीती आयोगाची 11 वी नियामक परिषद बैठक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीत 28 राज्ये आणि 5 केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधित्व करणारे मुख्यमंत्री, नायब राज्यपाल आणि प्रशासक सहभागी झाले. सर्व 28 राज्यांचे मुख्यमंत्री नीती आयोगाच्या नियामक परिषद बैठकीत सहभागी होण्याची ही पहिलीच वेळ होती. अनेक प्रमुख अर्थव्यवस्था अनिश्चितता आणि आर्थिक आव्हानांचा सामना करत असताना भारताची विकासगाथा जगाला प्रेरणा देत आहे, असे पंतप्रधानांनी या कार्यक्रमात सांगितले. आत्मनिर्भरतेविषयी राष्ट्राचा संकल्प अधिक दृढ करण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला. विशेषतः नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात जागतिक सर्वोत्तम पद्धती अवलंबण्याचे आणि लागू करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

विकसित भारताचे ध्येय साध्य करण्यासाठी केंद्र आणि राज्यांनी मिळून काम केले पाहिजे, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले. विकसित भारताची संकल्पना प्रत्येक राज्य, जिल्हा, तालुका आणि गावाचा सामूहिक संकल्प झाली पाहिजे, असे

## रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या उपायांवर चर्चा

नियामक परिषदेच्या बैठकीत मुख्यमंत्री आणि नायब राज्यपालांनी एकत्र येऊन समावेशक मानव विकासाच्या प्रारूपावर चर्चा केली. त्याचसोबत या बैठकीत देशभरात उद्योजकता, कौशल्य विकास यात वाढ करण्यावर आणि स्थायी रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या उपायांवर चर्चा करण्यात आली. नीती आयोगाच्या नियामक परिषदेत, 26 ते 28 डिसेंबर 2025 या कालावधीत आयोजित मुख्य सचिवांच्या 5 व्या राष्ट्रीय संमेलनातील शिफारशींवर विचार झाला.

नीती आयोगाच्या 11 व्या नियामक परिषद बैठकीबाबत वार्ताहर परिषद पाहण्यासाठी बाजूचा क्यू आर कोड स्कॅन करावा.





“सहकारी संघवादाच्या भावनेने प्रेरित आपण सर्व भारताच्या विकासयात्रेला गती देण्यासाठी मिळून काम करत आहोत. केंद्र आणि राज्यांचे सामूहिक प्रयत्न 'विकसित भारताचा' आपला सामायिक दृष्टिकोन साकारण्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावतील.

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

## प्रमुख मुद्द्यांवर पंतप्रधानांचे दिशानिर्देश

- भारताने ज्या देशांबरोबर मुक्त व्यापार करारांवर स्वाक्षरी केली आहे; त्या देशांकडून सक्रियरित्या गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी तसेच युवा आणि एमएसएमईसाठी संधी निर्माण करण्याकरिता राज्यांना प्रोत्साहित केले गेले पाहिजे.
- राज्यांनी एक जिल्हा एक उत्पादन यावर अधिक लक्ष पुरवले पाहिजे आणि संरक्षण क्षेत्रातील निर्मिती संधींचा लाभ घेतला पाहिजे.
- 'एआय'कडे एक संधी म्हणून पाहिले पाहिजे आणि लोकांना भविष्यासाठी आवश्यक कौशल्ये शिकवून सज्ज केले पाहिजे.
- अंमली पदार्थ आणि सायबर फसवणुकीसारख्या सामाजिक आव्हानांचा बीमोड करण्यासाठी समन्वित प्रयत्न केले पाहिजेत.
- 'एल निनो' मुळे उत्पादनाची चिंता निर्माण होत आहे, त्याकडे लक्ष वेधण्याबरोबरच जलसंरक्षण आणि नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्याचे आवाहन राज्यांना केले.
- राज्यांनी जागतिक भूराजकीय संकटाचा सामना करण्यासाठी आणि भारताची क्षमता बळकट करण्यासाठी केंद्रासोबत भक्कमपणे उभे असल्याची भावना व्यक्त केली.

ते म्हणाले. देशाचे युवा देशाची सर्वात मोठी संपत्ती असून जवळपास 70 कोटी भारतीय हे 25 वर्षांपेक्षा कमी वयाचे आहेत, असे पंतप्रधानांनी सांगितले. युवावर्गाला भविष्यातील संधी आणि आव्हानांसाठी सज्ज करतील अशा शिक्षण, कौशल्य विकास आणि क्षमता निर्माणाच्या उपक्रमांवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन त्यांनी राज्यांना केले.

या वर्षीच्या बैठकीचा विषय विकसित भारत@2047 साठी समावेशक मनुष्यबळ विकास, असा होता. याचा उद्देश वय, क्षेत्र, लिंग किंवा सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीचा विचार न करता, प्रत्येक भारतीयाच्या कल्याण आणि विकासावर लक्ष केंद्रित करणे, हा होता. बैठकीला उपस्थित मुख्यमंत्री, नायब राज्यपाल आणि प्रशासकांनी पंतप्रधान मोदी यांचे पंतप्रधानपदाची 12 वर्ष पूर्ण झाल्याबद्दल अभिनंदन केले. या बैठकीत रचनात्मक चर्चा झाल्याचे आणि यात राज्यांच्या आकांक्षा, आशा, अनुभव, सर्वोत्तम पद्धती आणि आव्हाने यांचे प्रतिबिंब उमटल्याचे पंतप्रधानांनी म्हटले आहे. ■



# ज्यांनी अवघड काळामध्ये सांभाळली होती देशाची धुरा

*आदर्शवादी राजकीय नेते, शिक्षणतज्ज्ञ आणि अर्थतज्ज्ञ गुलझारीलाल नंदा, असे एकमेव व्यक्ती आहेत, जे दोनदा देशाचे काळजीवाहू पंतप्रधान झाले. देशाच्या पंतप्रधानांचे आकस्मिक निधनामुळे निर्माण झालेल्या अवघड काळात त्यांनी देशाची धुरा सांभाळली. साधेपणा आणि राष्ट्रसेवेसाठी अखंड समर्पित राहिलेल्या नंदा यांना 1997 मध्ये देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान- भारतरत्न प्रदान करून गौरवण्यात आले. देशाचा विकास आणि दुर्बल घटकांची उन्नती, याबाबतचे त्यांचे विचार राष्ट्राला आजही प्रेरणा देतात. ..*

**जन्म : 4 जुलै 1898, मृत्यू :15 जानेवारी 1998**

आदर्शवादी राजकीय नेत्याचे सर्वश्रेष्ठ उदाहरण म्हणजे गुलझारीलाल नंदा. त्यांनी दोन वेळा देशाची धुरा सांभाळली मात्र सरकारी सुख-सुविधांची कधी इच्छा बाळगली नाही. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी कारावास सहन केला. श्रमिकांचा ते आवाज बनले आणि सत्तेच्या शिखरावर पोहोचूनही त्यांनी साधेपणानेच आयुष्य व्यतीत केले. त्यांनी आपल्या जीवनात प्रचाराचे कुठलाही प्रकारे प्रचाराचे ढोल वाजवले नाहीत. त्यांचे कार्य एक मौन तपस्या होती. सत्तेत राहूनही सत्तेपासून ते दूर राहिले. राजकारणात राहूनही मूल्य आणि मर्यादांची कास त्यांनी कधी सोडली नाही. साधेपणाचा आदर्श मानल्या जाणाऱ्या नंदा यांच्या कमालीच्या साधेपणाबद्दल बोलताना असे सांगितले जाते की, देशाची अनेक मोठी पदे भूषवूनही ते भाड्याच्या घरात राहत होते.

पंजाबमधल्या सियालकोट इथे दिनांक 4 जुलै 1898 रोजी गुलझारीलाल नंदा यांचा जन्म झाली. त्यांनी लाहोर, आग्रा आणि अलाहाबाद इथून शिक्षण घेतले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी 1932 मध्ये त्यांना कारावास भोगावा लागला. नंतर वर्ष 1942 ते 1944 या काळातही ते कारावासात होते. वर्ष 1937 मध्ये मुंबई विधानसभेसाठी ते निवडले गेले आणि वर्ष 1937 ते 1939 पर्यंत मुंबई सरकारमध्ये ते संसदीय सचिव राहिले. नंतर मुंबई सरकारमध्ये कामगार मंत्री ( 1946 -1949 ) असताना त्यांनी मुंबई राज्याच्या कायदेमंडळात कामगार विवाद विधेयक सादर केले. स्वातंत्र्यानंतर ते देशाच्या राजकारणात सक्रिय झाले आणि अनेक पदे त्यांनी भूषवली. वर्ष 1962 आणि 1963 मध्ये ते केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्री तर 1963 ते 1966 पर्यंत ते गृहमंत्री होते.

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मृत्यूनंतर त्यांनी 27 मे 1964 रोजी भारताचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. यावेळी 13 दिवस ते काळजीवाहू पंतप्रधान राहिले. ताश्कंद येथे लालबहादूर शास्त्री यांच्या मृत्यूनंतर गुलझारीलाल नंदा यांनी पुन्हा 11 जानेवारी 1966 रोजी पंतप्रधान म्हणून शपथ घेतली आणि 13 दिवस ते काळजीवाहू पंतप्रधान राहिले. नंतरच्या दिवसांमध्ये त्यांनी राजकारणातून संन्यास घेतला आणि समाजकल्याणासाठी आपले जीवन समर्पित केले.

गुलझारीलाल नंदा एक आदर्शवादी राजकीय नेते होते, तसेच चांगले लेखकही होते. एक लेखक म्हणूनही त्यांनी उत्तम कामगिरी केली. अनेक पुस्तके त्यांनी लिहिली. 15 जानेवारी 1998 रोजी 100 व्या वर्षी त्यांचे निधन झाले. आपल्या अस्थी कुरुक्षेत्र येथे ठेवण्यात याव्यात, अशी त्यांची अंतिम इच्छा होती. त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या अस्थी गुलझारीलाल नंदा स्मारक येथे ठेवण्यात आल्या. कुरुक्षेत्र विकास मंडळाच्या देखरेखीखाली 4 जुलै 1999 रोजी स्मारकाची पायाभरणी तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी केली. यावेळी केंद्रीय गृहमंत्री लालकृष्ण अडवाणी आणि मनुष्यबळ विकास मंत्री डॉ. मुरली मनोहर जोशीदेखील उपस्थित होते. ▪



Narendra Modi
@narendramodi

धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांच्या बलिदान दिनानिमित्त त्यांना कोटी कोटी वंदन. त्यांनी जल, जंगल आणि जमिनीच्या संरक्षणासाठी परदेशी राजवटीविरुद्ध दुर्दम्य साहसाचे दर्शन घडवत संघर्ष केला. त्यांचे संपूर्ण जीवन आदिवासी समाजाचा स्वाभिमान, संस्कृती आणि अधिकारांच्या संरक्षणासाठी समर्पित होते. मातृभूमीसाठी सर्वस्व अर्पण करण्याची त्यांची गाथा देशाच्या प्रत्येक पिढीमध्ये राष्ट्रभक्ती जागवत राहील.



Rajnath Singh
@rajnathsingh

संरक्षण कॉरिडॉरच्या माध्यमातून उत्तर प्रदेश भारताच्या संरक्षण क्षेत्राला आत्मनिर्भर बनवत आहे. येथे लखनौमध्ये ब्रह्मोसची निर्मिती होत आहे. आणखी इतर प्रकारेही उत्तर प्रदेश संरक्षण निर्मिती क्षेत्र बळकट करत आहे.



Amit Shah
@AmitShah

पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रीय मंत्रिमंडळाने दिल्ली -एनसीआरला प्रदूषणमुक्त करण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. पेट्रोल-डिझेलवरचे 2 लाख ट्रक आणि 16 हजार बस टप्प्याटप्प्याने बीएस-4, इलेक्ट्रिक तसेच सीएनजी वाहनात रूपांतरित करण्याच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमासाठी 9,585 कोटी रुपयांची मंजुरी देण्यात आली आहे. हा निर्णय दिल्ली -एनसीआरची हवा स्वच्छ करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण ठरेल, तसेच पेट्रोलियम आयातीवरील अवलंबित्व कमी करून देशाच्या अर्थव्यवस्थेला गती प्रदान करेल.



Nitin Gadkari
@nitin_gadkari

भारताचे सर्वात प्रदीर्घ काळ निवडून आलेले पंतप्रधान म्हणून ऐतिहासिक टप्पा पूर्ण केल्याबद्दल आज केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत आदरणीय पंतप्रधान श्री @ narendramodi यांचे सर्व सदस्यांद्वारे अभिनंदन करण्यात आले.



Giriraj Singh
@girirajsinghbjp

पीएलआय योजनेच्या माध्यमातून भारताचे वस्त्रोद्योग क्षेत्र नवी शिखरे गाठण्याच्या दिशेने आगेकूच करत आहे.
राउंड-3 अंतर्गत 22 नव्या कंपन्यांना मंजुरी मिळाल्याने 2,339 कोटी रुपयांची गुंतवणूक, 15,561 कोटी रुपयांचा संभाव्य व्यापार तसेच 36,217 नव्या रोजगार संधींचा मार्ग प्रशस्त होईल.
वाढती गुंतवणूक, सशक्त उद्योग आणि रोजगार निर्मितीसह आत्मनिर्भर भारताचा संकल्प निरंतर बळकट होत आहे.



Gajendra Singh Shekhawat
@gssjodhpur

पंतप्रधान श्री @narendramodi यांच्या नेतृत्वात गेल्या 12 वर्षांत अन्नदाता शेतकऱ्यांचे जीवन बदलले आहे. बीज ते बाजारापर्यंत शेतकरी समृद्धीचा बदल अनुभवत आहेत. पीएम-किसानद्वारा थेट मदत, ई-नाममुळे मोठे बाजार, मृदा आरोग्य पत्रिका आणि नवे तंत्र यामुळे शेती सुलभ आणि फायदेशीर झाली आहे. पीक विमा आणि मत्स्य संपदासारख्या योजनांनीही अन्नदात्याला नवी ऊर्जा दिली आहे.

---

पीएम मोदी ने की नई पीढ़ी के योगदान की प्रशंसा

## युवा भारतीय देश और दुनिया के भविष्य को दे रहे आकार

पीएम ने कहा कि भारत के युवा विज्ञान और तकनीक से लेकर विनिर्माण, अंतरिक्ष, सेमीकंडक्टर और ड्रोन जैसे अलग-अलग क्षेत्रों में अपनी छाप छोड़ रहे हैं

छोटे कस्बों और गांवों से आगे आए युवा

खेलों में भी बढ़ा रहे देश का गौरव

प्रधानमंत्री ने फ्रांस में 'भारत इनोवेट्स' कार्यक्रम को संबोधित किया

## वैश्विक समाधानों का उपभोक्ता ही नहीं, प्रदाता भी बना भारत : मोदी

जनसत्ता ब्यूरो
नई दिल्ली, 14 जून।



## भारत ने 12 वर्षों में स्वास्थ्य सेवाओं को आम लोगों के लिए बनाया सुलभ : मोदी

नई दिल्ली। प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ने रविवार को कहा कि बीते 12 वर्षों में भारत ने गुणवत्तापूर्ण स्वास्थ्य सेवाओं को अधिक सस्ता और आम लोगों की पहुंच में लाने के लिए व्यापक काम किया है। प्रधानमंत्री ने कहा कि सरकार स्वस्थ भारत के निर्माण के लिए ऐसे सभी प्रयासों को आगे भी जारी रखेगी।

पीएम बोले- स्वस्थ भारत के निर्माण के लिए जारी रहेंगे प्रयास

सोशल मीडिया पोस्ट में प्रधानमंत्री ने कहा कि देश को इस बात पर गर्व है कि भारत दुनिया की सबसे बड़ी स्वास्थ्य योजना आयुष्मान भारत के लिए जाना जाता है, जो समाज के सबसे कमजोर वर्गों को उच्च गुणवत्ता वाली स्वास्थ्य सेवाएं उपलब्ध कराती है। उन्होंने कहा, पीएम भारतीय जनऔषधि परियोजना जैसी योजनाओं ने दवाओं, स्टेंट व घुटने के प्रत्यारोपण को सस्ता बनाया है। इससे लाखों लोगों को राहत मिली है और इलाज का खर्च कम हुआ है। देश में मेडिकल कॉलेजों और सीटों की संख्या बढ़ने से चिकित्सा शिक्षा पहले की तुलना में अधिक सुलभ हुई है। एजेंसी

## भारत-फ्रांस ने रक्षा, तकनीक पर बढ़ाए कदम, कई मुद्दों पर चर्चा

फ्रांस में मोदी-मैक्रों ने द्विपक्षीय बैठक की



मैक्रों की सेल्फी, भारतीयों में उत्साह

स्पेस सेक्टर में बढ़ेगी भागीदारी

नए लक्ष्य तय किए

एआई से स्पेस तक, भविष्य की तस्वीर साफ

भारत नवाचार का देश है : मैक्रों

मोदी और मैक्रों ने कलाकृतियों का अवलोकन किया

## 'महिलाओं को पूरी क्षमता दिखाने को राजग सरकार ने दिया माहौल'

नई दिल्ली, प्रेट्र : प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी ने कहा कि राजग सरकार के प्रयास सम्मान, अवसर और सशक्तीकरण में निहित हैं और इनसे ऐसा माहौल तैयार हुआ है जहां महिलाएं अपनी पूरी क्षमता को पहचान सकती हैं और राष्ट्र निर्माण में और अधिक मजबूती से योगदान कर सकती हैं।

मोदी ने शुक्रवार को कहा कि पिछले 12 वर्षों में राजग सरकार ने महिलाओं के नेतृत्व में विकास को आगे बढ़ाने के लिए काम किया है, और यह विभिन्न क्षेत्रों में स्पष्ट रूप से दिखाई दे रहा है। उन्होंने कहा कि वित्तीय समावेशन और उद्यमिता से लेकर शिक्षा, स्वास्थ्य देखभाल, स्वच्छता, आवास, खेल, विज्ञान और शासन तक, महिलाएं विभिन्न क्षेत्रों में महत्वपूर्ण भूमिका निभा रही



प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी ● फाइल फोटो

### 'नारी शक्ति' को आगे बढ़ा रहा सरकार का माडल : शाह

नई दिल्ली, प्रेट्र : केंद्रीय गृह मंत्री अमित शाह ने कहा कि मोदी सरकार का "महिला नेतृत्व विकास" माडल 'नारी शक्ति' के सम्मान, सुरक्षा और सशक्तीकरण को आगे बढ़ा रहा है। शाह ने एक पोस्ट में कहा, "बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ" से लेकर उज्ज्वला योजना के

## विकसित भारत के लिए राज्यों के बीच संवाद सहयोग, अनुभवों का आदान-प्रदान जरूरी : मोदी

नीति आयोग की बैठक में पीएम ने कहा-वैश्विक अनिश्चितताओं के बीच भारत तेजी से बढ़ रहा आगे



70 करोड़ युवा भारत की सबसे बड़ी पूंजी

## विश्वभर के नेताओं ने पीएम को दी बधाई

जागरण न्यूज नेटवर्क, नई दिल्ली : वैश्विक नेताओं ने प्रधानमंत्री नरेन्द्र मोदी को भारत के इतिहास में सबसे लंबे समय तक निर्वाचित प्रधानमंत्री बनने पर हार्दिक बधाई दी है। उन्होंने मोदी के परिवर्तनकारी शासन की जमकर सराहना की है। श्रीलंका के राष्ट्रपति अनुरा कुमारा दिसानायके ने एक पत्र के माध्यम से इस उपलब्धि को भारत की लोकतांत्रिक परिपक्वता और जनता के मोदी सरकार में निरंतर विश्वास का प्रतीक बताया।

जागरण ब्यूरो के अनुसार, दिसानायके ने लिखा -" भारत गणराज्य के इतिहास में सबसे लंबे समय तक निर्वाचित प्रधानमंत्री बनने पर सरकार और श्रीलंका की

● श्रीलंकाई राष्ट्रपति दिसानायके ने लिखा पत्र, कहा-यह मोदी सरकार में निरंतर जनता के विश्वास का प्रतीक



नरेन्द्र मोदी●

● पापुआ न्यू गिनी के पीएम ने मोदी को रोल माडल व लीडरशिप का उदाहरण बताया

उल्लेखनीय है। इससे न केवल शासन की उत्कृष्ट क्षमता, बल्कि आम लोगों के जीवन में ठोस सुधार लाने और चुनौतियों के बीच भी

एक व्यक्तिगत वीडियो संदेश में प्रधानमंत्री मोदी को "एक रोल माडल व लीडरशिप का उदाहरण" बताया। कहा- "20 करोड़ से अधिक लोगों को गरीबी से निकालकर सामान्य जनजीवन में लाना अद्भुत उपलब्धि है।" उन्होंने भारत से द्विपक्षीय संबंधों को और मजबूत करने की इच्छा जताई।

**एएनआइ के अनुसार,** त्रिनिदाद और टोबैगो की प्रधानमंत्री कमला प्रसाद बिसेसर ने भी मोदी को यह कहते हुए बधाई दी कि उनके नेतृत्व में भारत वैश्विक मामलों में एक प्रमुख आवाज के रूप में उभरा है। उन्होंने कहा कि एक साधारण शुरुआत से लेकर 1.40 अरब लोगों

रामसर स्थळांचे शतक...

## भारताचे 100 वे रामसर

# जयप्रकाश नारायण पक्षी अभयारण्य

*भारतातील रामसर स्थळांच्या यादीत 100 वे स्थळ म्हणून उत्तर प्रदेशातल्या बलिया येथील जयप्रकाश नारायण पक्षी अभयारण्य जोडले गेले आहे. हे अभयारण्य पक्षांच्या विविधतेने समृद्ध असून 'सुरहा ताल' या नावाने ओळखले जाते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रामसर स्थळांच्या संख्येची शताब्दी झाल्यानिमित्त आनंद व्यक्त केला आहे. ही कामगिरी जागतिक पातळीवर भारताची नेतृत्व भूमिका अधिक बळकट करते. हे असे शतक आहे, जे केवळ संख्या नव्हे तर संरक्षण, जैव विविधता आणि शाश्वत विकासाप्रती भारताच्या संकल्पाची सांगते कहाणी...*

### रामसर स्थळांची कहाणी...

- भारत हा 1971 मध्ये इराणमधील रामसर येथे स्वाक्षरी झालेल्या रामसर करारातील एक करारबद्ध पक्ष आहे. भारत 1 फेब्रुवारी 1982 रोजी या करारावर स्वाक्षरी करणारा देश बनला.
- रामसर स्थळे म्हणजे रामसर करारांतर्गत मान्यताप्राप्त पाणथळ जागा.
- भारतात 31 वर्षांत, म्हणजेच 2014 पर्यंत, 26 रामसर स्थळे घोषित करण्यात आली होती, तर गेल्या 12 वर्षांत 74 नवीन स्थळांची भर पडली आहे.
- इंदूर आणि उदयपूर ही भारतातील पहिली रामसर पाणथळ शहरे बनली (जानेवारी 2025).

**12 वर्षांत 4 पट झाली रामसर स्थळे**

26
2014

100
2026

> “नैसर्गिक पर्यावरण आणि पाणथळ जागांच्या संरक्षणाविषयी भारताची दृढ वचनबद्धता या यशातून दिसून येते. हे प्रयत्न जैवविविधतेचे संरक्षण करणे, परिस्थितीकीय संतुलन राखणे आणि भावी पिढ्यांसाठी अधिक हरित भविष्य घडवणे, यासाठी साहाय्यभूत आहेत.
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



न्यू इंडिया समाचार पाक्षिक

आर.एन.आय, DELHIN/2020/78812, 1-15 जुलै, 2026

आरएनआय DELHIN/2020/78812 ( प्रकाशन दिनांक - 16 जून 2026, एकूण पृष्ठ-42 )

मुख्य संपादक
धीरेंद्र ओझा, प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

प्रकाशक
कंचन प्रसाद, महासंचालक,
केंद्रीय संचार ब्यूरो

खोली क्रमांक 278, केंद्रीय संचार ब्यूरो,
सूचना भवन, दुसरा मजला, नवी दिल्ली
110003 येथून प्रकाशित